अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड






www.surajyadigital.com गुरुवार, दि. ५ जानेवारी २०२३ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १०० वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# ठाकरेंना 'वंचित'चा प्रकाश

# शिंदे कवाडेंच्या दारी

✔ सुराज्य/सोलापूर

**फुटलेली उध्दव ठाकरेंची शिवसेना आणि सुसाट सुटलेली एकनाथ शिंदे यांची बाळासाहेबांची शिवसेना यांच्यात सुरू असलेल्या कुरघोड्या काही थांबण्याचे नाव घेईनाशा झाल्या आहेत. एका गटाने वार केला की दुसऱ्या गटाकडून प्रहार ठरलेलाच आहे. शिवसेनेची ताकद मजबूत करण्यासाठी ठाकरे गटाने वंचित बहुजन आघाडीसोबत युतीची घोषणा केल्यानंतर अवघ्या चोवीस तासांच्या आतच शिंदे गटाने पीपल्स रिपब्लिकन पार्टीसोबत युती केल्याचे बुधवारी पत्रकार परिषदेत जाहीर केले. ठाकरेंच्या शिवसेनेला 'वंचित'चा प्रकाश मिळणार असल्याचे स्पष्ट होताच शिंदेंच्या शिवसेनेने कवाडेंचे दार ठोठावल्याने शह आणि काटशहचे राजकारण सुरूच असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.**



### शिवशक्ती-भीमशक्ती नारा जुना

यापूर्वी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवशक्ती-भीमशक्ती एकत्रीकरणाचा प्रयोग केला होता. त्यावेळी शिवसेनेने रामदास आठवले यांच्या आरपीआयसोबत युती केली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा उध्दव ठाकरे यांनी बाळासाहेबांची तीच घोषणा केली असून यावेळी घटनाकारांचे नातू प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन विकास आघाडीशी जवळीक केली आहे. बाळासाहेबांचा तोच नारा देत शिवसेनेचेच फुटीर नेते एकनाथ शिंदे यांनीही प्रा. जोगेंद्र कवाडेंच्या पीआरपीशी जवळीक साधली आहे.

शिवसेनेतील बंडानंतर खिळखिळी झालेली शिवसेना मजबूत करण्यासाठी उध्दव ठाकरे यांनी 'शिवसेना-भीमसेना एकत्र'चा नारा देत वंचित बहुजन विकास आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांना जवळ केले. 'वंचित'सोबतच्या युतीची घोषणा करून ठाकरे यांनी शिंदे गटाला शह दिला. त्यानंतर चोवीस तासांच्या आतच एकनाथ शिंदे आणि प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी शिंदे गट(बाळासाहेबांची शिवसेना) व पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या युतीची घोषणा संयुक्त पत्रकार परिषदेत बुधवारी केली.

### आंबेडकर-कवाडेंचे शिंदे-ठाकरेंवर आरोप

शिवसेनेची तोडफोड करून बनवलेले सरकार हे अनैसर्गिक असल्याची टीका प्रकाश आंबेडकर यांनी शिंदे गटावर केली आहे. दुसरीकडे कवाडे यांनी मात्र 'एकनाथ शिंदे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले नसून तळागाळातून संघर्ष करत वर येणारे नेतृत्व आज महाराष्ट्राच्या प्रमुखपदी बसले आहे' अशा शब्दात शिंदेंचे कौतुक केले आहे. उलट उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना आमच्या निवेदनाची दखलसुध्दा घेतली नाही, अशा शब्दात कवाडे यांनी ठाकरेंवर टिका केली आहे.

### शिवशक्तीकडे ना शिवसैनिक, ना भीमशक्तीकडे भीमसैनिक

एकीकडे आंबेडकर आणि कवाडे यांनी शिवसेनेच्या एका एका गटाशी हातमिळवणी केलेली असताना दुसरीकडे आरपीआय(आ) गटाचे प्रमुख केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मात्र ठाकरे आणि आंबेडकर यांच्यावर टीका केली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेत शिवसैनिक उरले नसून आंबेडकरांच्या भीमसेनेत भीमसैनिक शिल्लक राहिले नाहीत, असा टोला लगावला आहे. सध्या आठवलेंचा पक्ष भाजपसोबत असून आठवले हे भाजपच्या कोट्यातून राज्यसभेचे खासदार आहेत.

## खंडणी मागितल्या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : महापालिकेने संस्मरण उद्यान भाड्याने दिलेले असतानाही अस्लम मुन्शी, सैफन अमिनसाब शेख, उमरसाब बेरिया, रज्झाक मकानदार व सादिक मकानदार हे शौकत मुस्तफा पठाण (रा.दक्षिण सदर बझार, केशव नगर) यांच्याविरुध्द तक्रारी अर्ज करून उपोषणाला बसले. त्यातील अस्लम मुन्शी व सैफन शेख या दोघांनी २५ व ५० लाखांची मागणी केली, अशी फिर्याद शौकत पठाण यांनी सदर बझार पोलिसांत दिली.त्यावरून दोघांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, अस्लम मुन्शी याने वेळोवेळी २५ लाखांची मागणी केली. त्यानंतर २३ डिसेंबर २०२२ रोजी संशयितांनी घरी बोलावून ५० लाखांची मागणी केली. सैफन शेख याने २६ डिसेंबरला महापालिकेत प्रकरण मिटवून घेतो म्हणून ५० लाखांची मागणी केली. महापालिकेच्या करारानुसार संस्मरण उद्यान चालविणे व विकसित करण्यासाठी भाड्याने घेतले.महापालिका आयुक्तांनी ते दिलेले असतानाही तक्रारी अर्ज देऊन त्या दोघांनी पैशांची मागणी केली, असे फिर्यादी शौकत पठाण यांनी पोलिसांना सांगितले. २३ ते २६ डिसेंबर दरम्यान हा प्रकार झाल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. त्यानुसार दोघांविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल झाला असून सहायक फौजदार शेख तपास करीत आहेत.

## तोतया व्यक्ती उभी करून परस्पर जमीन हडपली; तिघांवर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : हिरज (ता. उत्तर सोलापूर) येथील गट नं. २३०/२ मधील १५ एकर २८ गुंठे शेतजमीन तिघांनी बनावट कागदपत्रे तयार करून तोतया व्यक्ती उभी करून हडप केली.

त्यानुसार विजय तुकाराम खडतरे (सह दुय्यम निबंधक, सोलापूर उत्तर-२) यांनी सरकारतर्फे सदर बझार पोलिसांत फिर्याद दिली. एका व्यक्तीने मुकुंदराज चंद्रकांत गायकवाड असल्याचे भासवून ती जमीन रमेश कुमार बन्सीलाल (रा. पुणे रोड) यांना विकली. दोन महिन्यांनी ही बाब समोर आली आणि सहनिबंधकांनीच पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून महेबूब इब्राहिम सय्यद (रा. बुधवार पेठ, पठाण चाळ) व गंगाधर नामदेव शेंडकर (रा. वडदेगाव, ता. मोहोळ) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

## पानमंगरूळ येथे जावयाने केला सासूवर चाकूने हल्ला

✔ सुराज्य/सोलापूर

आजारी असलेल्या जावयाच्या आईला पाहण्यास आलेल्या सासूवर चाकुने हल्ला करून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना पानमंगरूळ (ता. अक्कलकोट) येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली.



लक्ष्मी राजू सूर्यवंशी (वय ४९ रा.पाथरी जि.परभणी) असे जखमी झालेल्या सासूचे नाव आहे. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून किरण साळुंखे( मुलगी)यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. त्यांना स्वप्निल शिवाजी साळुंखे (जावई) आणि त्याचा भाऊ सागर साळुंखे या दोघांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे. जखमी झालेल्या लक्ष्मी सूर्यवंशी यांची मुलगी किरण हिचा विवाह स्वप्नील साळुंखे (रा.पानमंगरूळ) याच्यासोबत झाला.

सध्या किरण ही पुण्यात शिक्षण घेत आहे. तिची सासू आजारी असल्याने लक्ष्मी सूर्यवंशी त्यांचे पती राजू आणि मुलगी किरण असे तिघे सोमवारी सायंकाळी पानमंगरुळ येथे गेले होते. त्यावेळी किरकोळ तक्रारीवरून जावई स्वप्नील आणि सागर साळुंखे या दोघांनी त्यांना चाकू आणि लाथा बुक्क्याने मारहाण केली.अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# मानधनावरील १५० अधिकारी, कर्मचाऱ्यांना कायम सेवेची प्रतीक्षा

## — विविध संघटनांची मागणी; महापालिकेतही झाला होता ठराव —



✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेत गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून विविध महत्त्वाच्या पदावर मानधनावरील अधिकारी व कर्मचारी हे कार्यरत आहेत. मानधनावर कार्यरत असलेल्या सुमारे १५० कर्मचारी व अधिकाऱ्यांपैकी काही जणांची वयोमर्यादा संपत आलेली आहे. तत्पूर्वी या मानधनावरील कर्मचाऱ्यांना महापालिकातील सेवेत कायम करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शासनाने महापालिकेसाठीच्या आकृतीबंध मंजूर केला आहे. या आकृतीबंधानुसार महापालिकेत विविध पदावरील सुमारे ११२५ पदे रिक्त आहेत.

त्यापैकी या मानधनावर कार्यरत असलेली विविध पदेही रिक्तच आहेत. त्या रिक्त पदांवर या मानधनावरील कर्मचाऱ्यांना कायम सेवेत समाविष्ट करावे, अशी मागणी संघटनांकडून होत आहे. धर्मवीर शहर हद्दवाढ कर्मचारी संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महापालिकेच्या मानधनावरील कर्मचारी व अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्यासंदर्भात प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले आहे.

### या पदावर आहेत मानधनावरील कर्मचारी

सोलापूर महापालिकेत गेल्या अनेक वर्षापासून विविध पदांवर मानधनावर कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत. यामध्ये उद्यान अधीक्षक, सहाय्यक उद्यान अधीक्षक, पर्यावरण अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, जीवशास्त्रज्ञ, एसी ऑपरेटर, स्टेनो टायपिस्ट यासह विविध महत्त्वाच्या पदावर मानधनावरील कर्मचारी- अधिकारी कार्यरत आहेत. मंजूर आकृतीबंधात ही पदे रिक्त आहेत. त्या पदावर या मानधनावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्याची मागणी आहे.

### कायम करण्याबाबत महापालिकेत झाला होता ठराव

शासन निर्णय दि. ३० सप्टेंबर २०२१ अन्वये परभणी महापालिकेने तसेच शासन निर्णय दिनांक २ नोव्हेंबर २०२१ अन्वये नांदेड वाघाळा महापालिकेने मानधनावरील कार्यरत असलेल्या सर्व सेवकांना कायमस्वरूपी नियमित समावेश केला आहे. त्याच धर्तीवर महापालिकेच्या आकृतिबंधातील रिक्त पदांवर मानधनावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना कायमसवेत समाविष्ट करून घेण्यासंदर्भात सोलापूर महापालिकेच्या दि. १७ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या सभेत सर्वानुमते ठराव (क्रमांक ५३८) मंजूर करण्यात आला. त्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची मागणी होत आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नववर्षाचे संकल्प फक्त लिहून काढलेत! पळायचं बघू...


कल्याण
678-11-380

मेन बाजार
489-15-258


# अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना थेट शासनस्तरावरुनच मदत

✔ सुराज्य/सोलापूर

**शासनाच्या नव्या निर्णयानुसार आता थेट शासनस्तरावरुनच बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार आहे. शासनाकडून यादी प्रसिध्द झाल्यानंतर शेतकऱ्यांना महा ई सेवा केंद्रांतून स्वत:चे आधार प्रमाणीकरण करून घ्यावे लागणार आहे. त्यानंतरच त्यांच्या बँक खात्यात नुकसान भरपाई जमा होईल, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.**

▸ आधार प्रमाणिकरणानंतरच मिळणार मदत निधी

▸ १५ जानेवारी रोजी यादी जाहीर होणार



महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन प्रणालीतून अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात भरपाईची रक्कम जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार बाधित शेतकऱ्यांच्या याद्या जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे पाठविण्यात येत आहेत. जिल्हा प्रशासनाकडील याद्यांवर शासन स्तरावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर ग्रामपंचायत निहाय याद्या प्रसिध्द होतील, त्या याद्या ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये डकविण्यात येतील.

शेतकऱ्यांनी त्या यादीतील त्यांचे नाव, बँक खात्याची शहानिशा करुन सीएससी सेंटर किंवा महा ई सेवा केंद्रांत शेतकऱ्यांनी स्वत:चे आधार प्रमाणीकरण करुन घ्यायचे आहे. त्यानंतरच त्यांच्या बँक खात्यात भरपाईची रक्कम जमा होणार आहे.

### ▸ २६ हजार शेतकऱ्यांना ३६ कोटी


सप्टेंबर २०२२ मध्ये जिल्ह्यातील अक्कलकोट, दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर तालुक्यात अतिवृष्टी झाली होती. त्यात या तीनही तालुक्यातील २६ हजार शेतकऱ्यांना ३६ कोटी रुपयांची रक्कम मिळणार आहे. जानेवारी महिनाअखेर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात भरपाईची रक्कम जमा होण्याची शक्यता आहे. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी पवार यांनी दिली.

### ▸ बार्शीतील फटका कारखान्याचा परवाना रद्द

बार्शी तालुक्यातील पांगरी येथील शाभेच्या दारु कारखान्यात मोठा स्पोट होऊन तिघांचा मृत्यू झाला होता. त्याची संपूर्ण चौकशी पूर्ण झाली आहे. कारखानदाराने काही अटी व शर्थीचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे त्याचा परवाना जिल्हा प्रशासनाकडून रद्द करण्यात येत आहे. शिवाय मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# निर्लज्जम् सदा सुखी

'निर्लज्जम् सदासुखी', अशी एक मराठीत म्हण आहे. ज्याला लाजलज्जा नसते, तो कसाही वागतो आणि कसेही बोलायला लागतो. आपण काय कर्म करतो, याचेही भान त्याला नसते. कुणी निंदा केली काय? कुणी ठोकले तरी काय? तो हसतच असतो. अशा बेफाम माणसांना 'निर्लज्ज' म्हणतात. त्याला कशाचेही सुखदुःख नसते. म्हणून त्याला 'सदासुखी' असे म्हटले गेले आहे. आता राजकीय क्षेत्रात जो वाचाळपणा चालला आहे, तो बेशरमपणाचा कळस आहे. एक मॉडेल अभिनेत्रींचा सार्वजनिक ठिकाणी शब्दांचा आणि शरीराचा जो धांगडधिंगा सुरू आहे तो निर्लज्जपणाचा कहर म्हणावा लागेल. अंतरंगी फॅशनसाठी ओळखली जाणारी मॉडेल आणि अभिनेत्री उर्फी जावेद ही भाजपाच्या महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्याशी घातलेली हुज्जत महाराष्ट्राला शोभणारी आहे काय? याचे उत्तर पुरोगामी विचाराच्या लोकांकडून अपेक्षित आहे. सार्वजनिक ठिकाणी केले जाणारे अंगविक्षेप आणि त्याचे केले जाणारे समर्थन पुरोगाम्यांना योग्य वाटते काय? उर्फीच्या कपड्यांवर वाघ यांनी आक्षेप घेतला आणि हा वाद सुरू झाला. सुरुवातीला त्यांनी ट्वीट करत उर्फीचा समाचार घेतला नंतर मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे त्यांना धाव घ्यावी लागली. 'उर्फी जावेदरुपी स्त्री देहाचा बाजार रोखा', अशी विनंती त्यांना करावी लागली. एकीकडे सार्वजनिकरीत्या देहप्रदर्शन करायचे आणि वाघ यांनाच उद्धटपणाची भाषा वापराची, हे कशाचे द्योतक आहे. उर्फी ज्या धर्माची आहे, त्या धर्ममार्तंडांना हे मान्य आहे काय? समाजात असे काही प्रश्न उद्‌भवले की-अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा पुढे यायला लागतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्यात स्वैर आचरण सांगितलेले नाही. भारतात कोणी कसे कपडे परिधान करावे, याबद्दल काही



नियम आहेत का? मुंबई पोलीस उर्फीवर कोणत्या कलमांच्या आधारे कारवाई करू शकते? आणि ती कारवाई झाल्यास शिक्षेची तरतूद काय? हेही प्रश्न ऐरणीवर आणले गेले आहेत. याबाबत विधी क्षेत्रातून जो अभिप्राय आला आहे, तो काही अंशी दिलासा देणारा आहे. भारतात महिला व पुरुषांच्या कपड्यांबद्दल कोणते नियम आहेत? या प्रश्नावर एक विधिज्ञ सांगतात, 'भारतात सार्वजनिक ठिकाणी महिला व पुरुषांनी कसे कपडे घालावे, याबद्दल कोणतीच नियमावली नाही. आपण हवे तसे कपडे परिधान करू शकतो. पण काही धार्मिक ठिकाणे, शाळा किंवा एखाद्या संस्थेचे काही नियम असतील, ड्रेस कोड असेल तर तसे कपडे परिधान करावे लागतात. बऱ्याच ठिकाणी मंदिरांमध्ये जाण्यासाठी ड्रेस कोड असतो, तो तिथल्या मंदिर प्रशासनाने ठरवलेला असतो. आपण त्या मंदिराचे, धार्मिक स्थळाचे पावित्र्य जपले जावे, म्हणून त्या नियमांचे पालन करतो. पण इतर ठिकाणी मात्र तुम्ही कोणते कपडे परिधान करावे, यावर कोणतीही निर्बंध नाही.' पोलीस उर्फीवर कोणत्या कलमांच्या आधारे कारवाई करणार हाही प्रश्न समोर आणला गेला आहे. पोलीस उर्फीवर अश्लीलतेच्या आधारावर कारवाई करतील, असे सांगितले जाते. आयपीसीच्या कलम २९२ अंतर्गत उर्फीवर कारवाई होऊ शकते. तिच्याविरोधात तक्रार दिल्यानंतरच पोलीस या कलमेअंतर्गत कारवाई करू शकतील. चित्रा वाघ यांनी यांनी तिच्याविरोधात लेखी तक्रार दिली असेल, तर पोलीस ही कलम उर्फीवर लावतील. लावायलाच पाहिजे. अश्लीलतेवरून पहिल्यांदा कारवाई झाल्यास ३ वर्षे तुरुंगवास आणि १ हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. तसेच दुसऱ्यांदा या कलम अंतर्गत दोषी आढळल्यास ७ वर्षांचा तुरुंगवास आणि ५ हजारांपर्यंत दंडाची तरतूद असल्याचे सांगितले जाते. सामान्य जनता कायद्याचा सन्मान करते पण उर्फीला शिक्षा होणार का? हा खरा प्रश्न आहे. झालाच तर न्यायालयीन प्रक्रिया होत राहील. शिवाय ती जामिनावर सुटूही शकेल. उर्फीसारख्या निर्लज्ज लोकांना ही शिक्षा पुरेसी ठरेल काय? बाहेर आल्यानंतर हे लोक पुन्हा असा बेशरमपणा करायला लागतील. उर्फी करतेय मग आम्हांलाही स्वातंत्र्य आहे, असे म्हणून देहप्रदर्शन करणारी जमातच उदयास येईल. असली प्रवृत्ती ठेचून काढण्यासाठी कठोर कायदाच हवा किंवा अशा देहप्रदर्शनावर बंदी घातली पाहिजे. पोलिसांनी देखील कायदा नाही म्हणून अशा प्रवृत्तीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पोलीस दलाकडून कानाडोळा होत असल्याचे पाहून पुण्यात कोयता गँग उदयास आली. या गँगची मुजोरी इतकी बळावली की, अखेर पोलिसांना या गँगमधील एकाचे पाय काठीने फोडून काढावे लागले. लोकांमधून अशा शिक्षेचे स्वागत झाले. समाजाची नाडी राजकारण्यांनी व पोलीस दलाने ओळखायला हवी.

---

सामाजिक

# नव्या स्वप्नांची पेरणी

**नागपूर येथे सुरू झालेल्या 'भारतीय विज्ञान परिषदे'त आजवरच्या भारताच्या बहुमुखी वैज्ञानिक वाटचालीचा आढावा घेण्यासह नव्या वैज्ञानिक स्वप्नांची पेरणीही होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्‌घाटन करताना भविष्यातील वाटचालीचे सूचन केले आहे. यंदा या परिषदेचा विशेष भर 'महिला आणि विज्ञान' असा आहे.**

---

नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सुरू झालेल्या इंडियन सायन्स काँग्रेसच्या माध्यमातून वैज्ञानिक जिज्ञासेची अनेक कवाडे खुली होणार आहेत. १८८५मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना झाली. नंतर राजकीय व सामाजिक सुधारणांना सुयोग्य व्यासपीठ मिळावे यासाठी १९१४मध्ये इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशनची स्थापना झाली. प्राध्यापक जे. एल. सिम्प्सन आणि प्राध्यापक पी. एस. मॅकमोहन या ब्रिटिश तज्ज्ञांनी या संघटनेची पायाभरणी केली. देशभरात शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व्हावा व त्यास प्रोत्साहन हा हेतू त्यामागे होता. कलकत्ता येथील एशियाटिक सोसायटीत १९१४मध्ये न्यायमूर्ती सर आशुतोष मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या सायन्स काँग्रेसचे आयोजन करण्यात आले होते. जगभरातील अनेक शास्त्रज्ञ, विज्ञान शिक्षक व शिक्षणतज्ज्ञांची उपस्थिती लाभलेली ही काँग्रेस कमालीची यशस्वी ठरली. या काँग्रेसने पुढील उद्दिष्टे आखली होती.

१) भारतात विज्ञानप्रसारास चालना व प्रोत्साहन देणे. २) भारतातील सुयोग्य ठिकाणी दरवर्षी या काँग्रेसचे आयोजन करणे. ३) विज्ञानविषयक माहिती, अहवाल, प्रकाशने यांची माहिती देणे. ४) विज्ञानाचा प्रसार करण्यासाठी निधी उभारणी करणे. या आव्हानांचा आवाका लक्षात आल्यानंतर संघटनेच्या यशासाठी तिच्या पदाधिकाऱ्यांनी विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे-धोरणांची आखणी केली. या काँग्रेसची लोकप्रियता व लोकसहभाग वाढविण्यासाठी या पदाधिकाऱ्यांनी समाजाला अनेक प्रकारे प्रोत्साहित केले. याचा परिणाम म्हणून ही काँग्रेस उत्तरोत्तर, वर्षागणिक नवी यशोशिखरे सर करू लागली. या काँग्रेसमध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी देशातील व जगभरातील अनेक शास्त्रज्ञ सहभागी होऊ लागले. यामध्ये नोबेल पारितोषिके विजेत्यांचाही समावेश होता. या काँग्रेसची सदस्यसंख्या आता तीन लाखांपेक्षा अधिक आहे.




### देशहिताशी सांगड

दरवर्षी वर्षाच्या सुरुवातीस म्हणजे जानेवारीत या काँग्रेसचे आयोजन केले जाते. या काँग्रेसच्या रौप्यमहोत्सवी वार्षिक कार्यक्रमापासून (१९३८) विदेशी शास्त्रज्ञ सहभागी होण्यास सुरुवात झाली. दिल्लीत १९४७मध्ये या काँग्रेसचे अध्यक्षपद पं. जवाहरलाल नेहरू यांनी भूषवले. विशेष म्हणजे, विज्ञानाप्रति जिज्ञासू असणाऱ्या नेहरूंनी या कार्यक्रमाच्या सर्व सत्रांत उपस्थिती नोंदवली. यामुळे सायन्स काँग्रेस केवळ यशस्वी ठरली नाही, तर देशभरात वैज्ञानिक वातावरण निर्माण झाले. वैज्ञानिक वातावरण निर्माण करण्यासाठी ही काँग्रेस किती उपयुक्त आहे ही बाबही यातून अधोरेखित झाली. यामुळे अनेक विदेशी प्रतिनिधी-शास्त्रज्ञही या काँग्रेसकडे आकृष्ट झाले. विविध विषयांतील विदेशी संस्था, तज्ज्ञ व शास्त्रज्ञ या काँग्रेसमध्ये सहभागी होण्याचे प्रमाण यानंतर कमालीचे वाढले. स्वातंत्र्योत्तर काळात या काँग्रेसला केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाचे भक्कम पाठबळ लाभले. १९६३मध्ये दिल्लीत सायन्स काँग्रेसचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला, तर १९७३मध्ये हीरकमहोत्सवाचे यजमानपद जालंधरला लाभले. यानंतर १९७६मध्ये काँग्रेसच्या आखणीत काही बदल करण्यात आले. नेहमीच्या चर्चा व परिसंवादांऐवजी देशहिताशी सुसंगत संकल्पना केंद्रस्थानी आल्या. अनेक शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, धोरणकर्ते आणि प्रशासकीय अधिकारी या संकल्पनांवर विचारमंथन करू लागले. देशाच्या व जगाच्या बदलत्या गरजा ओळखून सायन्स काँग्रेसचे प्रतिनिधी धोरणे व मार्गदर्शक तत्त्वांचा आढावा घेऊ लागले.

### बहुआयामी आयोजन

सीएसआयआर, डीआरडीओ, इस्रो, एनपीएल आदी शीर्षस्थ सरकारी संस्था सायन्स काँग्रेसमध्ये आपापले प्रदर्शनीय स्टॉल उभारू लागल्या. देशाने साधलेली वैज्ञानिक प्रगती ही विद्यार्थी, शिक्षक तसेच जनसमूहापर्यंत पोहोचविणे हा त्यामागील उद्देश होता. नागरिकांमध्ये विज्ञानविषयक जिज्ञासा निर्माण करणे; ग्रामीण भागात तंत्रज्ञान पोहोचविणे या प्रमुख हेतूने सायन्स काँग्रेसचे आयोजन करण्यात येते. तसेच हजारो शास्त्रज्ञ, विद्यार्थी, कल्पक उत्पादकांना या माध्यमातून योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांची उत्पादने समाजासाठी कशी उपयुक्त ठरतील हे पाहणे, त्यातील विशिष्ट उत्पादनांना स्वामित्व हक्क मिळवून देणे आणि स्टार्ट अपच्या परिसंस्थेची स्थापना, ही उद्दिष्टेदेखील या सायन्स काँग्रेसने निर्धारित केली. या सायन्स काँग्रेसमध्ये चर्चा, परिसंवाद, कार्यशाळा, प्रदर्शने, उत्पादनांचे सादरीकरण, नवीन प्रकल्पांचे प्रदर्शन आदी बहुआयामी आयोजन केले जाते.

यंदाची सायन्स काँग्रेस नागपूरमध्ये आयोजिण्यात आली आहे. हा वार्षिक कुंभमेळा ७ जानेवारीपर्यंत चालणार आहे. यंदाच्या काँग्रेसमध्ये मुले, महिला, आदिवासी, शेतकरी, अभियंते व शास्त्रज्ञ यांच्याशी संबंधित अनेक संकल्पनांवर आधारित कार्यक्रमांचा समावेश आहे. देशभरातून एक लाखांहून अधिक प्रतिनिधी यामध्ये सहभागी होतील, असा अंदाज आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक वक्ते व तज्ज्ञ या काँग्रेसमध्ये संबोधित करणार आहेत. सायन्स काँग्रेसची प्रदीर्घ यशस्वी परंपरा यंदाच्या संमेलनातून अधिक प्रभावीपणे पुढे जाईल, यात शंका नाही.

### वैज्ञानिक प्रगतीचा आलेख

नागपूर विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये निरनिराळ्या सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी फार्मास्युटिकल सायन्सेस, गणित आणि केमिस्ट्री विभागांमध्ये सत्रे आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमस्थळी विविध प्रदर्शनांचेही आयोजन करण्यात आले आहे. केंद्र सरकारचे विविध विभाग, वैज्ञानिक आणि आरोग्य संस्था यांचे संशोधन, भारताची वैज्ञानिक प्रगती दाखविणारी प्रदर्शने यांचा यात समावेश आहे. संरक्षण विभागाचे विशेष प्रदर्शन, इस्रोचे 'स्पेस ऑन व्हील्स' हे प्रदर्शनही अनुभवता येईल. देशभरातील विद्यार्थ्यांनी बनविलेली मॉडेल्सही येथे मांडली जाणार आहेत.

राज्यपाल आणि कुलपती भगतसिंह कोश्यारी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, द इंडियन सायन्स काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांची या उद्‌घाटन सोहळ्यास उपस्थिती होती. या सायन्स काँग्रेसमध्ये सहभागी होण्यासाठी देशभरातून प्रतिनिधी दाखल झाले आहेत. या प्रतिनिधींच्या नोंदणीसाठी सोमवारी दोन मोठे डोम उभारण्यात आले होते. तमिळनाडूपासून दिल्लीपर्यंत आणि गुजरातपासून ईशान्येच्या राज्यांपर्यंत विविध ठिकाणांहून प्रतिनिधी आले आहेत. निरनिराळ्या सत्रांमध्ये सादरीकरण करणारे संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचा यामध्ये समावेश आहे.

(लेखक इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशनचे आजीव सदस्य आहेत.)

**- डॉ. विवेक नानोटी.**

---

टुडेज ब्लॉग

# सुरक्षिततेच्या नियमांकडे कानाडोळा नको

**१ तारखेला सगळीकडे नवीन वर्षाचे उत्साहात स्वागत होत असताना आपल्या राज्यात मात्र, दोन मोठ्या दुर्घटना घडल्याने नवीन वर्षाच्या उत्साहावर पाणी पडले. वर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १ जानेवारी रोजी नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील जिंदाल पॉलिफिल्म या कंपनीला लागलेल्या भीषण आगीत १४ कामगार गंभीर जखमी झाले तर दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जखमींमधील ४ ते ५ कामगार अत्यवस्थ असल्याने मृत्यूचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. इगतपुरीच्या या कंपनीला लागलेल्या आगीने हळहळ व्यक्त होत असतानाच त्याच दिवशी बार्शी तालुक्यातील पांगरीजवळील शिराळा येथेही भीषण आग लागल्याची बातमी आली.**

बार्शी तालुक्यातील शिराळ्या या गावात फटाक्यांच्या कारखान्याला लागलेल्या आगीत नऊ जणांचा अक्षरशः होरपळून मृत्यू झाला तर नऊ जण गंभीर जखमी झाले आहेत. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी या दोन दुर्घटना घडल्याने महाराष्ट्र शोक सागरात बुडाला. अर्थात अशाप्रकारच्या दुर्घटना घडण्याच्या आपल्या राज्यातील या पहिल्याच घटना नाहीत. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. अशा दुर्घटनांची आपल्याला सवयच झाली आहे कारण आपल्या राज्यात अशा दुर्घटना सातत्याने घडतात.

दुर्घटना घडली की टीव्ही चॅनलवर काही काळ ब्रेकिंग न्यूजची पट्टी झळकते. नेते, अधिकारी घटना स्थळी धाव घेतात. टीव्हीवर बाईट देतात. मृतांना आणि जखमींना नुकसानभरपाई दिली जाते. दुर्घटनेची चौकशी करण्याची घोषणा होते. त्यासाठी एक चौकशी आयोग नेमला जातो. या चौकशी आयोगाचे पुढे काय होते हे गुलदस्त्यातच राहते. दुर्घटनेस कोण दोषी आहेत? त्यांना काय शिक्षा होते हे कोणालाच समजत नाही. काही दिवसांनी लोकही या दुर्घटना विसरतात. मग पुनः व काही दिवसांनी अशीच एखादी दुर्घटना घडते मग तोच सोपस्कार पार पाडला जातो. या किंवा अशाप्रकारच्या दुर्घटनेत सर्वसामान्य नागरिकांचा जीव जातो. काहींना कायमचे अपंगत्व येते पण येथे



सर्वसामान्य नागरिकांच्या जिवाचे मोल शून्य आहे. गरीबच आहे, सर्वसामान्य नागरिक आहे तो मेला काय आणि जगला कोणाला काय फरक पडणार आहे? अशीच मानसिकता सर्वांची झाली आहे. याच दुर्घटनेत जर एखादा उच्चपदस्थ अधिकारी किंवा सिलिब्रेटी मेला असता तर ती मोठी बातमी ठरली असते. अर्थात अशा दुर्घटना वारंवार घडूनही आपण त्यातून काहीही बोध घेत नाही हे ही तितकेच खरे आहे. कंपन्या, कारखाने किंवा प्रकल्पांमध्ये अशा प्रकारच्या दुर्घटना का वाढत आहेत याचा विचार शासन आणि प्रशासनाने करायला हवा. बेफिकिरी आणि सुरक्षा विषयीच्या नियमांची योग्य अंमलबजावणी न करणे हे या दुर्घटनामागचे महत्त्वाचे कारणे आहेत.

औद्योगिक दुर्घटनेमध्ये एक गोष्ट ठामपणे सांगता येते ती म्हणजे जर सुरक्षा विषयक नियम पाळले आणि सावधगिरी बाळगली तर तिचा अंदाज नक्की येऊ शकतो. मात्र, बऱ्याचशा औद्योगिक दुर्घटनांनंतर असे स्पष्ट झाले आहे की बेफिकीरपणा किंवा सुरक्षिततेच्या नियमांकडे कानाडोळा केल्यामुळेच बहुतांशी अपघात घडतात. बॉयलर जुना झालेला असणे, पाईपलाईनमध्ये गळती असणे. प्रकल्पाच्या आतील एखादा व्हॉल्व्ह बंद असल्यामुळे दबाव प्रचंड प्रमाणात वाढणे किंवा इंधनाचा प्रवाह अचानक वाढणे अशा कारणांमुळे अशा आगी लागतात. म्हणूनच या सर्व बाबींची वेळेवर तपासणी होणे गरजेचे आहे. तपासणीकडे जिथे कानाडोळा होतो तिथे दुर्घटना होतेच म्हणूनच औद्योगिक कंपन्या, कारखाने आणि प्रकल्पामध्ये अधिकची काळजी घेणे गरजेचे आहे.

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

---

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल - ६



ज्याच्या आचरणात धर्म नसतो, त्याची तुलना पशूसोबत केली जाते. धर्माचरण केले तरच पशुत्वापासून मुक्ती मिळू शकते. एक सुभाषितकार म्हणतो,

**'आश्‍वर्यमेद् मनुष्यलोके अमृतं परित्यज्य विषं पिबन्ति । धर्म प्रसंगादपिनाचरन्ति पापं प्रयत्नेन समाचरन्ति ।'**

सुभाषितकाराला माणसाचे वर्तन पाहून आश्‍चर्य वाटते. धर्माचरण करण्याचा प्रसंग येऊन देखील माणूस धर्माचरण करीत नाही आणि प्रसंग नसताना देखील प्रयत्नपूर्वक पापाचे आचरण करतो. सहज प्राप्त झालेल्या अमृताकडे पाठ फिरवून हट्टाने विष पिण्यासारखीच ही गोष्ट आहे. म्हणून शिवकृपा संपादन करण्यासाठी माणसाने धर्माचरण केलेच पाहिजे.

**अधर्म न स्पृशेत् किंचिद् विहितं धर्ममाचरेत् । तं च कामविनिर्मुक्तं तमपि ज्ञानपूर्वकम् ।।१६.६१।।**

जीवनात धर्माचरण करण्याचा प्रसंग आला तरी अधर्माचरण करु नये. हिंसा करण्याची, खोटे बोलण्याची वेळ आली तरी तसे करणे टाळावे. 'जे करा' असे शास्त्र सांगते अशा विहित कर्माचे प्रयत्नपूर्वक आचरण करावे. पूजा, जप, ध्यान आदी धर्माचे आचरण फळाची अपेक्षा न ठेवता करावे. थोडे केल्यावर फार मिळावे अशी वृत्ती व्यापाऱ्याची असते, साधकांची नसते.

**(क्रमशः) – काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

## मांज्यापासून सावध राहा...

आता मकरसंक्रात जवळ येत आहे. या सणानिमित्त भारतातील अनेक शहरात पतंग उडविण्याची धामधूम चालू असते. या पतंगात धोकादायक मांज्याचा वापर केला जातो. त्यामुळे अनेक अपघात दरवर्षी होत असतात.नुकताच गुजरातमध्ये सुरत तेथील कामरेज चार रस्ता भागात मोटार सायकलवरून जाणाऱ्या एका युवकाचा गळा मांज्याने कापला व त्यातच त्याचा जागेवरच मृत्यू झाला. गेल्या अनेक वर्षात मांज्यामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. महाराष्ट्रातील पुणे व पिंपरी चिंचवड येथे गेल्या काही वर्षात मांज्यामुळे अनेक तरुण मृत्युमुखी पडले आहेत. या धोकादायक मांज्यापासून जनतेने सावध राहावे. या मांज्यावर बंदी आणून त्याच्या वापरावर निर्बंध आणले पाहिजेत तरच यापासून सुटका होईल. ग्राहकांनी सुद्धा मांजा असलेला दोरा पतंगासाठी खरेदी करू नये. एकूणच सर्वच थरावर याची दक्षता घ्यावी. सरकारने सुद्धा मांज्या बाजारात दिसता उपयोगी नाही, अशी उपाययोजना करावी.



**- शांताराम वाघ, पुणे.**

## प्रतिबंधक उपाय महत्वाचे

प्रतिबंधक उपाय व आग लागल्यावर काय करावे, बाहेर पडण्याचे रस्ते, याबाबत कोणाला फोन करायचा त्यांचे नंबर व उपकरणे वापराची माहिती व प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. तेव्हा यासंदर्भात प्रबोधन व महत्वाची माहिती असणे गरजेचे आहे. मोठ्या आगी लागल्यावर आरोप प्रत्यारोप होतात, पण एकत्रित प्रयत्न करून उपाययोजना असाव्यात असे वाटते. दुर्घटना होऊ नयेत यासाठीचे उपाय, प्रशिक्षण कदाचित महागडे वाटतील पण त्यामुळे मिळणारे संरक्षण व त्यामुळे संभाव्य अप्रिय प्रसंग टळतील व मोठे नुकसान होणार नाही असे वाटते. याबद्दल गांभीर्याने विचार व्हावा ही अपेक्षा!!




**- प्रफुल्लचंद्र काळे, नाशिक.**

---

## लोकांमधला अलौकिक नेता

**टोकाची विवंचना वाट्याला आलेल्या मराठवाड्याचे ज्वलंत प्रश्न हिरीरीने मांडणाऱ्या पहिल्या पिढीतील लोकप्रतिनिधींत अग्रणी असलेले भाई केशवराव धोंडगे यांच्या निधनाने सुसंस्कृत राजकारणाचा एक साक्षीदार काळाच्या पडद्याआड गेला. नांदेड-कंधार हे त्यांचे कार्यक्षेत्र असले, तरी अवघ्या वंचितांच्या प्रश्नांना त्यांनी जाहीर सभा आणि विधिमंडळात प्राधान्य दिले. शेतकरी कामगार पक्षाच्या विचारांचे भारावलेपण, चाचपडणाऱ्या बहुजनांना मार्ग दाखवणे आणि शेतकरी-कामगारांच्या बिकट प्रश्नांवर उपाय शोधण्यामुळे केशवरावांचे कार्य झळाळून उठते. मन्याड खोऱ्यातील समस्या त्यांनी राज्यभर पोचविल्या.**



आंदोलनाची न्यारी तऱ्हा आणि आक्रमकता पाहून 'मन्याडचा वाघ' अशी त्यांची ओळख रूढ झाली. मराठवाड्यात 'शेकाप'च्या विस्तारातही भाईंचे उल्लेखनीय योगदान राहिले. अमोघ वक्तृत्व, व्यासंग आणि जनसामान्यांच्या प्रश्नांची अचूक जाण असल्याने त्यांची राजकीय कारकीर्द उजळून निघाली. १९५७पासून कंधार मतदारसंघातून सहा वेळेस विधानसभा सदस्य आणि नांदेड मतदारसंघातून एकदा लोकसभा सदस्य म्हणून केशवराव विजयी झाले. दोन्ही सभागृहात त्यांनी अभ्यासू भाषणांची छाप उमटविली. त्यांची नर्मविनोदी शैली चर्चेचा विषय होत असे. मराठवाड्याची 'मुलूखमैदान तोफ' असेही त्यांचे कौतुक झाले. 'जय क्रांती'च्या घोषणने भाषणाला सुरुवात करून ते ओघवत्या शैलीत दिग्गजांना चर्चेत गारद करत. त्यांचा अभ्यास व शिस्तीचे धडे अनेकांसाठी प्रेरक ठरले.

आणीबाणीत त्यांना नाशिक कारागृहात १४ महिने कारावास सोसावा लागला. सत्ताधाऱ्यांशी तडजोड टाळण्याचा दुर्मीळ गुण त्यांच्यात होता. रस्त्यावरचे आंदोलन हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू. पिंडदान सत्याग्रह, बोंबल्या सत्याग्रह, शेणचारऊ सत्याग्रह, खर्डस कुत्री सत्याग्रह अशा सत्याग्रहांनी महाराष्ट्र ढवळून निघाला. आचार्य अत्रे यांचा 'मराठा' आणि धोंडगे यांचे 'जय क्रांती' यांच्यातील वैचारिक द्वंद्व एका पिढीने अनुभवले. धोंडगे यांनी ४० पुस्तके लिहिली. त्यांचे साहित्य म्हणजे सामाजिक व राजकीय इतिहासाचा दस्तावेज. त्यांनी जागतिक गुराखी साहित्य संमेलन आणि जागतिक गुराखी लोकनाट्य संमेलन सुरू केले. खेड्यापाड्यातील मुलांच्या शिक्षणासाठी श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी स्थापून त्यांनी ५७ शाळा आणि तीन महाविद्यालये सुरू केली. कुणी भेटायला आले की हातावर अत्तर लावून आणि खडीसाखर भरवून मायेने मुका घेणारे कनवाळू केशवराव कधीही विस्मृतीत जाणार नाहीत. असा लोकप्रतिनिधी पुन्हा होणे नाही!


---

# अल्पबचतीचे आश्‍वासक उत्पन्न

**केंद्र सरकारच्या विकासकामांना हातभार आणि त्याच वेळी सर्वसामान्य नागरिकांना निश्चित उत्पन्न मिळवण्याचा स्रोत असे दोन महत्त्वाचे उद्देश साध्य करणाऱ्या योजना म्हणून अल्पबचत योजनांकडे पाहिले जाते. घरगुती स्तरावरील खर्च करण्याजोगा पैसा योग्य पद्धतीने गुंतवणूक करुन त्यातून निश्चित उत्पन्न मिळवण्याचा मार्ग म्हणून कोट्यवधी नागरिकांसाठी या योजना वरदान ठरत आहेत. पूर्वहमीनुसार या योजनांवर व्याज दिले जाते. एकूण १२ प्रकारच्या अल्पबचत योजना देशात राबवल्या जात आहेत. या योजनांतून सरकारकडे जमा होणारा पैसा राष्ट्रीय अल्पबचत निधीमध्ये जमा केला जातो. सरकारची तूट भरून काढण्यासाठी हक्काचा पैसा म्हणून या निधीकडे सरकार पाहते.**

कोरोना संसर्गाच्या काळात या योजनांनी सरकार आणि नागरिक दोघांनाही उत्पन्नाचा भक्कम स्रोत निर्माण करून दिला. त्यामुळे या योजनांचे महत्त्व अबाधित राहिले.

या योजना तीन गटांमध्ये विभागल्या



गेल्या आहेत. पोस्टातील योजना (बचत खाते, आवर्ती जमा, मुदतठेवी, मासिक उत्पन्न योजना), बचत प्रमाणपत्रे (राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे व किसान विकास पत्रे) आणि सामाजिक सुरक्षा योजना (सुकन्या समृद्धी, पीपीएफ व ज्येष्ठ नागरिक बचत योजना) या तीन गटांत अल्पबचत योजना सुरू आहेत.

या योजनांवर देण्यात येणारे व्याज केंद्र सरकार ठरवते व ते वेळोवेळी सुधारते. २०१०मध्ये यासाठी केंद्र सरकारने श्यामला गोपीनाथ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने सर्व अल्पबचत योजनांचे व्याज हा बाजाराशी संलग्न ठेवावे असे सुचवले.

सरकार आता दर प्रत्येक तिमाहीसाठी योजनांवरील व्याजदर घोषित करते. ३० डिसेंबर २०२२ रोजी सरकारने सुकन्या समृद्धी योजना आणि पीपीएफ वगळता बाकी सर्व अल्पबचत योजनांच्या व्याजदरांत जानेवारी ते मार्च २०२३ या तिमाहीसाठी ०.२० टक्के वाढ करून सर्वांना सुखद धक्का दिला.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## चपळगाववाडी येथे बालिका दिन उत्साहात साजरा

**अक्कलकोट** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चपळगाववाडी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संभाजी आरमार चे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत बापु डांगे, कार्याध्यक्ष शिवाजी तात्या वाघमोडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गौरीशंकर दोड्याळे, उपाध्यक्ष करीम नदाफ, मल्लिनाथ परशेट्टी निवृत्त आरोग्य अधिकारी ,ग्रामपंचायत सदस्या ललिता बन्ने, उज्वला गोविंदे, निर्मला परशेट्टी, जावेद नदाफ, शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष मुलका नदाफ, पंडीत परशेट्टी, ईलाई नदाफ, गुरूबसप्पा गोविंदे, गुडुमाबी नदाफ, संगिता गोविंदे, शशिकांत स्वामी, ग्रामसेविका बबिता गायकवाड, मुख्याध्यापक शिवशरण गोविंदे, स्वाती कडलासकर, तुकाराम जाधव, मंगल गोविंदे, ज्योती गोविंदे, माता पालक, किशोरी मुली व बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते. गणपती गोविंदे यांच्या कडून शाळेस पितळी घंटा अर्पण करण्यात आली. मल्लिनाथ परशेट्टी व रमेश केत यांच्या मार्फत सर्व विद्यार्थ्यांना मोफत स्पोर्ट्स ड्रेस देण्यात आला. मुख्याध्यापक शिवशरण गोविंदे यांनी आभार मानले तर सुत्रसंचालन सहशिक्षक जाधव यांनी केले. आभार गौरीशंकर दोड्याळे यांनी मानले.



## सोलापूर सिंहगड महाविद्यालयामध्ये उमंग २ के २२ उत्साहात

**सोलापूर** : केगाव येथील एन.बी.नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये उमंग २ के२२ उत्साहात संपन्न झाला.यादरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ट्रॅडिशनल डे, फनी गेम्स, संगीत, समाजप्रबोधन नाटक, मिस सिंहगड आणि मिस्टर सिंहगड आणि विविध कला गुणदर्शन मध्ये वैयक्तिक गायन, समूह नृत्य, समूह डान्स, लावणी, फॅशन शो असे विविध कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या उमंग २के २२ मधील स्पर्धेत क्रिकेट, बास्केट बॉल, हॉली बॉल, चेस, कॅरम कबड्डी, खो-खो आदीसह इतर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.मिस्टर सिंहगड व मिस सिंहगड या स्पर्धेत प्रथम वर्षाचे विद्यार्थी अनुक्रमे उदयनराजे भोसले व गौरी जिंदे विजयी ठरले. क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे सर्वसाधारण विजेतेपद प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पटकावले. विजेत्यांना सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे व शेखर जगदे, सिंहगड पब्लिक स्कूलच्या प्राचार्या सुनीता जॉन्सन, सिंहगड पब्लिक स्कूलचे उपप्राचार्य प्रकाश नवले, सिव्हिल विभागप्रमुख डॉ. प्रदीप तपकिरे, कॉम्प्युटर सायन्स विभागप्रमुख डॉ. दत्तात्रय गंधमल, जनरल सायन्स इंजिनीअरिंग विभागप्रमुख डॉ. विनोद खरात, इलेक्ट्रिकल विभागप्रमुख प्रा. विजय बिरादार, स्टुडन्ट वेलफेर डीन डॉ. सुवर्णा क्षीरसागर, स्पोर्ट्स विभागप्रमुख डॉ. करीम मुजावर ड्डकल्चरल् विभागप्रमुख प्रा.लक्ष्मी जंगम आदी मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.




## महिलांनी शिक्षणाचा उपयोग करत निरोगी आयुष्य जगावे : फाटे

**मोहोळ** : महिलानी दैनंदिन जीवनात शिक्षणाचा उपयोग करीत निरोगी जीवन जगावे असे प्रतिपादन संगीता नंदकुमार फाटे यांनी केले. मोहोळ अर्बन बँक आणि सावित्रीबाई महिला पतसंस्थेच्या वतीने आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व महिला पतसंस्थेचा वर्धापन दिवस या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. दोन्ही संस्थेच्या सभासद तसेच विविध स्तरातील बहुसंख्य महिलांच्या उपस्थितीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व संस्थापक शाहीर विश्वासराव फाटे यांच्या प्रतिमेस मा.चेअरपर्सन संगीता फाटे व भारती बरे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी रत्नप्रभा फाटे चेअर पर्सन ॲड. शमशाद मुलाणी, व्हॉ.चेअर पर्सन सविता शिंदे, संचालिका अरुणा घोंगडे, विजया नरुटे, रेखा कांबळे, सुरेखा ननवरे, ॲड. प्रांजली फाटे किर्ती शिंदे संध्या फाटे रुपाली शिदे आदी उपस्थित होत्या. यावेळीकार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेच्या सहा.व्यवस्थापक अनुराधा भालेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेचे व्यवस्थापक सिकंदर मुजावर, कर्मचारी प्रवीण शिंदे, मनीषा हेळकर, मोहोळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापक सुदर्शन शिंदे, सहा. व्यवस्थापक नितीन शिंदे, कर्मचारी आकाश शिंदे, वैशाली चव्हाण, खेलुदेव वाघमोडे, आमीन आतार, शहाबाज शेख यांनी परिश्रम घेतले.



## आनंदराव देवकते प्रशालेत विद्यार्थ्यांना शस्त्राबाबत मार्गदर्शन

**दक्षिण सोलापूर** : वडजी (ता. दक्षिण सोलापूर) येथील आनंदराव देवकते माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला येथे महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनानिमित्त दक्षिण सोलापूर पोलीस ठाणे अंतर्गत विद्यार्थ्यांना शस्त्राबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, पोलीस हवालदार गोपाळ साखरे, शंकर मुजगुंडे, महिला पोलीस भोसले आदींच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना शस्त्रांची ओळख व वापर याबाबत माहिती देण्याली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, निर्भय पथकाचे नाईकवाडी यांनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याण गजबार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## राजेंद्र मोतेवार यांचे निधन



**सोलापूर** : जुना विजापूर नाका उत्कर्ष नगर येथील रहिवासी प्रसिद्ध व्यापारी राजेंद्र बाबुराव मोतेवार यांचे वयाच्या ५८ वर्षी हृदय विकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सुन, नातू असा परिवार आहे. त्यांच्या वर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शहर-जिल्ह्यातील २४ लाख नागरिकांना मिळणार मोफत रेशन

- महिन्याला लागणार १३ हजार टनाच्या आसपास धान्य
- मिळणाऱ्या धान्याचा ग्राहकांना येणार मोबाईलवर मेसेज

**सुराज्य/सोलापूर**

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत जिल्ह्यातील २४लाख ९८हजार ४७० लोकांना जानेवारीपासून मोफत धान्य वितरण केले जात आहे. यासाठी महिन्याला जिल्ह्यात १३ हजार टनाच्या आसपास धान्य वाटप करावे लागणार आहे.देशातील एकही व्यक्ती उपाशी राहू नये, यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना केंद्र सरकारने सुरू केली आहे.**

या योजनेंतर्गत जिल्ह्यातील २४ लाख ५९ हजार ५६५ लोकांना ही योजना लागू राहणार आहे. या कार्डवर नोंद असणाऱ्या कुटुंबीयांनाही याचा फायदा होणार आहे.

शहर जिल्ह्यामध्ये १,८७० दुकाने आहेत.शहरात १ लाख १६ हजार १७२ कार्डधारक आहेत. ६ लाख ९५ हजार ७९० लोकसंख्या आहे. तर ग्रामीण भागात ४ लाख ६ हजार १२२ कार्डधारक आहेत. १९ लाख ५८ हजार ५३९ लोकसंख्या आहे. असे एकूण २४ लाख ५९ हजार ५६५ लोकांना प्रति महिना पाच किलो प्रमाणे १३ हजार टनच्या आसपास धान्याचे वाटप केले जाणार आहे.

३१ डिसेंबर २०२२ पर्यंत २ रुपये किलोप्रमाणे २ किलो गहू आणि तीन रुपये किलो प्रमाणे ३ किलो तांदूळ दिले जात होते. हेच गहू आणि तांदूळ आता जानेवारीपासून मोफत दिले जाणार आहे. प्रत्येक कार्डधारकाला महिन्याला पाच किलो धान्य दिले जाणार आहे. त्यामुळे कोणत्याही रेशनधान्य दुकानदाराकडून या धान्यासाठी पैसे आकारले येणार नाहीत. वर्ष भर मोफत धान्य मिळणार आहे.

जिल्ह्यातील रेशनधान्य दुकानदारांकडूनही याचे चांगल्या पद्धतीने वाटप केले जाणार आहे. मात्र कार्डधारकांनीही पाच किलो धान्यासाठी कोणत्याही प्रकारचे पैसे देऊ नयेत, पैसेची मागणी केल्यास पुरवठा विभाग अथवा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हा प्रशासनाकडे थेट तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**धान्याचा काळा बाजाराला आळा घालण्यासाठी तसेच ग्राहकांना किती धान्य प्रत्येक महिन्याला मिळते यासाठी मेसेज प्रणालीचा वापर केला जाणार आहे. यासाठी यंत्रणा उभी केली आहे. पॉश मशिनवर थंब केल्यानंतर धान्य प्रत्येक महिन्यला किती मिळते आणि किती मिळाले यांचा मेसेज ग्राहकांना जाणार आहे.**

## ट्रकमधील सव्वा लाखाचे प्लास्टिक पळविले

**सोलापूर** : ट्रकला बांधलेली ताडपत्री फाडून चोरट्यांनी ट्रकमधील सव्वा लाख रुपये किमतीच्या ४० पिशव्या पळविल्या. ही चोरी पुणे ते सोलापूर महामार्गावरील वडवळ येथे मंगळवारी पहाटे उघडकीस आली. यासंदर्भात मिलिंद मारुती सोनकांबळे (रा.उमरगा)या ट्रक चालकाने मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली.

तो पुणे येथून आपल्या एमएच२५-यु-२३५८ या ट्रकमध्ये प्लास्टिक दाणेच्या पिशव्या भरून सोलापूर मार्गे तामलवाडी येथे निघाला होता. पहाटे ४ वाजेच्या सुमारास वडवळ (ता.मोहोळ) येथील शितल हॉटेल जवळ ट्रक उभा केला. त्यावेळी त्याला ताडपत्री फाटलेली आढळून आली. तसेच ट्रकमधील २५ किलो वजनाच्या ४० पिशव्या गायब झाल्याचे दिसून आले. त्यानंतर त्याने पोलिसात तक्रार दाखल केली. पुढील तपास फौजदार शेख करीत आहेत.

## पिकांची नोंद मोबाईल ई-पीक पाहणी ॲपमधून करुन घ्यावी : तहसीलदार सिरसट

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील रब्बी पीक व संपूर्ण हंगाम पिकांची नोंद मोबाईल ई पीक पाहणी अँप मधून करुन घ्यावे असे आवाहन तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी केले आहे.



पुढे बोलताना तहसीलदार बाळासाहेब सिरसट म्हणाले, सदर पिकाची नोंद केल्यास गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे होणारे शेती पिकाचे नुकसान भरपाई आपल्याला मिळणेकामी सुलभ होईल. पीक पाहणी करणेकामी अडचण आलेस संबंधित तलाठी, कोतवाल, पोलीस पाटील यांचेशी संपर्क करावा.तसेच शेतजमीनीच्या उताऱ्यावर पिकांची नोंद करण्याच्या पारंपारिक पध्दतीमध्ये महसूल विभागाने आता बदल केला असून आपल्या पिकाची रिअल टाईम नोंदणी करण्याची सुविधा आता थेट शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यासाठी महसूल विभागाने टाटा ट्रस्ट, मुंबई यांचे सहकार्याने स्वतंत्र ॲप्लीकेशनची निर्मिती केली असून ई-पीक पाहणी असे या नव्याने विकसित केलेल्या ॲप्लीकेशनचे नाव आहे.

ई-पीक पाहणी चे मोबाईल ॲप व्हर्जन २ ची लिंक शशिंशज्ञ. ारहरलहीाळ.सीों.ळप या वेबसाईटवर उपलब्ध करुन दिलेली असून सदरचे ॲप्लिकेशन हे ऋक्षश्रश झश्रू डींश वरुनही डाऊनलोड करता येईल (https://epeek.mahabhumi.gov.in/pun/androidšapp/app-releaseš1.apk) त्यासाठी आपले मोबाईलमधील पूर्वीचे ॲप्लिकेशन डिलिट करावे.

## महापालिका आयुक्तांनी घेतला शिक्षण विभागाचा आढावा



**सोलापूर** : महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी शिक्षण विभागाचा सविस्तर आढावा घेतला. या आढावा बैठकीत आवश्यक त्या सूचनाही त्यांनी केल्या.

शिक्षण विभागांतर्गत किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत? पोषण आहार योजना, त्याचबरोबर किती शाळा सुरू आहेत? नेमके नियोजन कसे काय? याबाबतचा आढावा आयुक्तांनी यावेळी घेतला. काही दिवसांपूर्वी आलेल्या चीनच्या शिष्टमंडळाने महापालिकेतील एक शाळा दत्तक घेण्याचे ठरविले आहे. या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे. साधारणतः या एका शाळेसाठी ४० लाख रुपये खर्च करणार आहेत. त्याचबरोबर चीनमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी सोलापुरातील दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही ते देणार असल्याचे महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी यावेळी सांगितले.

### नो डिजिटल झोनमध्ये फलक लावल्यास होणार कारवाई

**न्यायालयाच्या आदेशानुसार शहरात विविध ठिकाणी नो डिजिटल झोन घोषित करण्यात आले आहेत. परंतु बेकायदेशीरपणे नो डिजिटल झोनमध्येच फलक लावले जातात. यासंदर्भात लक्ष वेधले असता नो डिजिटल झोनमध्ये फलक लावल्याच्या आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. रस्ते दुभाजकामध्ये लावण्यात आलेले नियमबाह्य जाहिरातीचे फलक देखील काढण्यात येतील, असे आयुक्तांनी सांगितले.**

## लष्कर परिसरात दोन गटात खंजीर आणि काठीने मारहाण; महिलेसह तिघे जखमी

**सुराज्य/सोलापूर**




महिलेस छेडछाड केल्याच्या कारणावरून कुरेशी यांच्या दोन गटात खंजीर,पाईप आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत एका महिलेसह तिघेजण जखमी झाले. ही घटना मंगळवारी रात्रीच्या सुमारास लष्कर परिसरातील कुरेशी गल्ली येथे घडली. जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अहमद अब्दुल्ला कुरेशी (वय ३५) त्याची पत्नी आफिया कुरेशी (दोघे रा. लष्कर) असे पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. महिलेस छेडछाड का करतो? असे विचारले असता सादीक कुरेशी आणि अन्य तिघांनी मिळून त्यांना पाईप आणि काठीने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील सादीक जलील कुरेशी (वय २६ रा.फक्रोधीन नगर,लष्कर) हा जखमी झाला. याच कारणावरून शिवीगाळ का केली. असे म्हणत अहमद कुरेशी आणि अन्य तिघांनी त्याला खंजीर, पाईप आणि लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे

### गंभीर अवस्थेत तरुण आढळला

तुळजापूर रोडवरील डी मार्ट जवळ राहुल विनोद टोणपे (वय२२ रा.शाहीर वस्ती) हा जखमी अवस्थेत आढळून आला. बुधवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. त्याला शोभा घंटे( नातेवाईक) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले.त्याच्या डोका,गळा आणि दोन्ही हाताच्या पंज्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केल्याच्या जखमा आहेत. त्याला जखमी कोण केले. हे अद्याप समजले नाही. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

### भाजल्याने ७ वर्षाचा मुलगा जखमी

पोखरापूर (ता.मोहोळ) येथे कागद पेटवून खेळत असताना शर्टाला आग लागल्याने साकेत लक्ष्मण शेंडगे (वय ७) हा मुलगा भाजून किरकोळ जखमी झाला. ही घटना सोमवारी सायंकाळी घडली. त्याला उपचारासाठी लक्ष्मण शेंडगे (वडील) यांनी सोलापुरातील रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## वैराग येथे अपघात; ३३ वर्षीय व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर** : बार्शी सोलापूर नवीन झालेल्या राज्य महामार्गवर वैराग या ठिकाणी आयसीसी बँकेसमोर मोटरसायकल ३ ई.बी.०९८२ या मोटरसायकलला धडक दिल्याने एका ३३ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. ही घटना २३ डिसेंबर २०२२ रोजी रात्री ९ :३० च्या सुमारास घडली असून मयताची पत्नी उषा ईश्वर थोरात यांनी माहिती दिल्याने वैराग पोलिसात उशिराने गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादीचा पती मयत ईश्वर हे बांधकाम सेंट्रींग चे काम करतात २३ डिसेंबर रोजी कामावरून घरी आल्यानंतर पुन्हा काम बघण्यासाठी इंदिरानगर येथे दत्तात्रय दौंडकर यांच्या घरी गेले होते. त्यानंतर परत काम ठरवून घराकडे येत असताना आयसीसी बँकेसमोर पती ईश्वर थोरात यांचा अपघात झाल्याचे फिर्यादीच्या शेजारी राहणारे संतोष ठिपे यांनी फिर्यादीला सांगितले की, तुमच्या पती ईश्वर यांचा अपघात झाला आहे. ते वैराग येथील मल्टीस्टेट हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. त्यानंतर फिर्यादी पत्नीने जाऊन पाहिले असता पतीच्या डोक्याला मार लागला होता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या संशयित व्यक्ती इसाक काशीम पठाण रा.इंदिरानगर याने त्याची स्वतःची मोटरसायकल क्रं१३ बी वाय ३३९२ या गाडीने डीवाडरच्या मध्ये येऊन हायगईने बेजबाबदारपणे वेगाने, अविचाराने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून धडक दिल्याने पती ईश्वर मयत झाल्याने वैराग पोलिसात तक्रार संशयित आरोपीच्या विरोधात तक्रार दाखल केली. अधिक तपास सदाशिव गवळी करीत आहेत.

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपातून पती दोषमुक्त

**सोलापूर** : पतीच्या छळास कंटाळून महानंदा पवार या विवाहितेस आत्महत्या करण्यास प्रवृत केल्याच्या आरोपातून तिचा पती सोपान पवार( रा.कामती तांडा ता.मोहोळ)याला गुन्हा शाबीत न झाल्याने निर्दोष मुक्त करण्याचा आदेश जिल्हा सत्र न्यायाधीश आर.डी.खेडेकर यांनी नुकताच दिला आहे. महानंदा हिने ४ जानेवारी २०१८ रोजी विष प्राशन केली होती. उपचारा दरम्यान ती शासकिय रुग्णालयात चौथ्या दिवशी मयत झाली. याप्रकरणी कामती पोलीसांनी सोपान पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

## लंम्पीने मृत पावलेल्या जनावरांचे अनुदान द्यावे : युवा सेना

**सुराज्य/सोलापूर**

लंम्पी आजाराने मृत पावलेली जनावरांचे अनुदान शेतकऱ्यांना तत्काळ मिळावे अशा आशयाचे निवेदन युवा सेना जिल्हा प्रमुख बालाजी चौगुले, सचिन बागल, गणेश इंगळे यांच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी शमा पवार यांना देण्यात आले. सोलापूर जिल्हा मधे लम्पी आजाराने २ हजार



जनावरे मृत पावली आहेत यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

जिल्ह्यातील २९०० जनावरे मृत पावली आहेत त्यातील फक्त ९१० जनावरांचे अनुदान शेतकऱ्यांना भेटले आहेत आणि त्यातील १९९० जनावरांचे अनुदान शेतकऱ्यांना भेटले नाही त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणींत आहे. शेतकऱ्यांना आर्थिक अनुदान न भेटल्यामुळे शेतकरी जनावरे खरेदी करू शकत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना तत्काळ अनुदान मिळावे. अन्यथा युवा सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा इशारा युवा सेनेच्या वतीने देण्यात आला, यावेळी अक्कलकोट तालुका प्रमुख विश्वनाथ कोगनुरे, महादेव बिराजदार, दिग्विजय मोरे आदी उपस्थित होते.

# मार्डीत अवतरले राम लक्ष्मण सीता; रामफेरीने गावात आध्यात्मिक वातावरण

**उत्तर सोलापूर** : भल्या पहाटे श्रीराम जयराम जय जय राम...हाताने टाळी मुखाने राम लंकेला गेले जय हनुमान....कपाळी केशरी गंध रामा तुझा मला छंद, या टाळ मृदंगाच्या तालावर जय घोषाने सारा मार्डी गाव दुमदुमून जातोय.

अशाच दर एकादशीला लहान मुलांना राम, लक्ष्मण व सीता मातेचा पेहराव केला जातोय त्यामुळे साऱ्या गावातील वातावरण अध्यात्मिक बनले आहे. गावात भावार्थ रामायण सुरू करावे, ही गावातील भाविकांची तळमळ होती. श्रीकांत मार्तंडे, बाळासाहेब भाकरे, नागनाथ मळेगावकर, शामल गवळी, छाया मिसाळ या भाविकांच्या पुढाकारातून गेल्या पाच ऑक्टोबर रोजी पेठेतील मारुती मंदिरात भावार्थ रामायणाला सुरुवात झाली. सुरवातीला प्रतिसाद तसा कमीच होता. पहाटे पाच वाजता गावातून रामफेरीला सुरुवात झाली. प्रारंभी दहा ते पंधरा जणांचा सहभाग असायचा. मात्र गावातील तरुण, तरुणींना व स्त्री पुरुषांना गोडी लागली आता दररोज साठ ते शंभर लोक रामफेरीत सहभागी होऊन रामनामाचा तल्लीन होतात. पेठेतील मारुती, भोई गल्ली, ग्रामपंचायत कार्यालया समोरील



मारुती मंदिर, हाटवट गल्ली, पाटील गल्ली, विठ्ठल मंदिर, निकते गल्ली, पेठेतून संत सावतामाळी मंदिर, रामलिंग चौडेश्वरी मंदिर या मार्गाने ही रामफेरी जाते. अन रामायण सुरू असलेल्या मारुती मंदिरात सारेजण विसावतात. महावीर माळी, संजय सुरवसे, नागेश मुडके, अशोक खेलबुडे, विष्णू जगताप, श्रीकांत मार्तंडे, प्रदीप मुडके, प्रमोद गवळी, पांडुरंग माळी, लक्ष्मण गोंगाणे, संजय कळसाईत, नानू मुडके, फुलाजी सुतार, हनुमंत मठे या भाविकांसह गावातील आबालवृद्ध मोठ्या संख्येने या रामफेरीत सहभागी होतात. रामायणात ब्रम्ह पत्रिका, लक्ष्मणशक्ती सोहळा यांना खूप महत्त्व आहे. तत्पूर्वी ब्रम्ह पत्रिका वाचन सोहळ्याला अकरा मारुतीला आमंत्रित करण्याची प्रथा आहे. त्यानुसार सोमवारी पहाटे भाविक अनवाणी पायाने मार्डी, नान्नज, वडाळा, गवळेवाडी, केमवाडी, जळकोटवाडी, सावरगाव, वडगाव, नरोटेवाडी या गावातील अकरा मारुतीचे दर्शन घेतले.विशेष म्हणजे विष्णू जगताप हे मार्डीतून निघाल्यापासून ५१ किमीची परिक्रमा पूर्ण होईपर्यंत कुठेच बसले नाहीत.



## १६५ जणांना शेतीपंपासहित घरगुती कनेक्शन मोफत

सुराज्य/कुर्डूवाडी : शिराळ टें. (ता. माढा) येथे सरपंच बाळासाहेब ढेकणे यांनी महावितरणच्या सहकार्यातून व ग्रामपंचायत शिराळ यांच्या माध्यमातून गुरुवारी २९ डिसेंबर रोजी मोफत कनेक्शनसाठी शिबिर आयोजित केले होते.

शिबिरात सुमारे १६५ ग्रामस्थांनी शेतीपंपाचे व घरगुती विजेचे कनेक्शन मोफत घेतले. यावेळी टेंभुर्णी महावितरण कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता जाधव, सहाय्यक अभियंता विकासकुमार रस्तोगी, सरपंच बाळासाहेब ढेकणे, आढेगाव शाखा अभियंता पाटील, मोडनिंब शाखा अभियंता लोकरे, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष सचिन जगताप, प्रहार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील, धनंजय मोरे, शिराळचे माजी सरपंच अरुण लोकरे, नवनाथ जगताप, अनिल केंदळे, माजी सरपंच महादेव पवार, ग्रामसेवक दौंड, अजिनाथ झिंगे, दिगंबर जगताप, उमेश झिंगे, अशोक भानवसे, अंकुश भानवसे, हिंमत तळेकर, राजाभाऊ भानवसे, उपसरपंच समाधान लोकरे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रेय कसबे, सदस्य माउली सुतार, पांडुरंग लोकरे आदी उपस्थित होते.




## नाईक शाळेत आरो मशीन भेट

सुराज्य/सोलापूर : हद्दवाढ भागातील रत्नमंजिरी नगर येथील गणेश नाईक प्राथमिक शाळेस बालाजी अमाईन्सच्यावतीने सी. एस. आर. अंतर्गत शाळेतील मुलांना शुध्दपाणी मिळावे याकरिता आरो मशीन भेट देण्यात आले. सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कार्यक्रमात आरो मशीनचे फीत कापून उद्‌घाटन बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास गणेश नाईक प्राथमिक शाळेचे संस्थापक शिवशरणअण्णा पाटील व बालाजी अमाईन्सचे तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार तसेच शहर वाहतूक शाखेचे अश्विनी भोसले उपस्थित होते. याप्रसंगी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक यांनी मुलांना शिक्षणाचा बरोबरीने चांगले संस्कार व चांगली वागणूक शिकवणे गरजेचे आहे तसेच 'सामाजिक बांधीलकी' याविषयी ज्ञान देण्याची आवशक्यता आहे, असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास शाळेचे बिराजदार, मदन पोलके-पाटील बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर उपस्थित होते.



## पिसेवाडी शाळेचे क्रिडा स्पर्धेत दैदीप्यमान यश

सुराज्य/वेळापूर : पं. स. माळशिरस (शिक्षण विभाग) यांच्यामार्फत आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत खो-खो सामन्यांमध्ये लहान गटात मुलांनी माळशिरस बीट मधील भांब शाळेला अंतिम सामन्यात एक डाव राखून पराभूत करून वेळापूर केंद्रातील जि. प. प्राथ. शाळा पिसेवाडीने तालुकास्तरीय स्पर्धेत विजेतेपद पटकाविले. तसेच खो-खोच्या स्पर्धेत मोठ्या गटातील मुलांनी पिसेवस्ती शाळेला एका डावाने हरवून पिसेवाडी शाळेने विजेते पदाचा मान पटकावला तसेच तालुकास्तरावरील लहान गटात मुलींच्या संघाने माळशिरस बीटमधील कचरेवाडी शाळेला अटीतटीच्या व रंगतदार सामन्यात १६ गुणांनी पराभूत करून जि. प. प्राथ. शाळा पिसेवाडीने विजेतेपद पटकावून मानाचा तुरा आपल्या शिरपेचात खोवला व पिसेवाडी शाळेने जिल्हास्तरावर एकूण ३ सामन्यात बहारदार प्रवेश करून विजयाची परंपरा व आपला दबदबा कायम ठेवला व शाळेचे नाव उज्ज्वल केले. या मुलांना मुख्याध्यापक रा. ज. घाडगे, ज्ञा. ग. साळुंखे, शि. बि. देशमुख जा. म. बनकर, सं. द. माळी, बी. ए. खाडे, वं. पं. देशमुख, प्र. बा. पाटील, अ. अ. सिंदफळकर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. पं. स. माळशिरसचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, विस्तार अधिकारी सायरा मुलाणी, हर्षवर्धन नाचणे, प्रदीपकुमार करडे तसेच विद्यमान सरपंच मोहन भाकरे, शाळा व्यवस्थापन समितीचे दादासाहेब पिसे, शिवाजी म्हेत्रे, हरिदास वाघ, प्रियांका पिसे आदींनी अभिनंदन केले व जिल्हास्तरीय क्रीडा स्पधसाठी शुभेच्छा दिल्या.

## अजित पवार यांच्या वक्तव्याचा भाजपने केला निषेध

विरोधी पक्ष नेते व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या बद्दल छत्रपती संभाजी महाराज धर्मवीर नव्हते अशा शब्दात तमाम हिंदूंच्या भावना दुखावणारे आणि छत्रपती संभाजी राजांच्या धर्मनिष्ठेवर शंका उत्पन्न करणारे वक्तव्य केले असून त्याच्या निषेधार्थ मंगळवारी मोहोळ येथे भारतीय जनता पक्ष, मोहोळ तालुका व शहरच्यावतीने नगर पालिकेसमोर मुख्य रस्त्यावर आंदोलन करण्यात आले. यावेळी अजित पवार यांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांचा अनन्वित छळ करून नंतर त्यांची क्रूरपणे हत्या केली. मात्र त्यांनी हिंदू धर्म सोडला नाही, धर्म बदलला नाही असे ते धर्मवीर होते. यावेळी महेश सोवनी, सुनील चव्हाण, अविनाश पांढरे, संजीव खिलारे, सुशील क्षीरसागर, गणेश झाडे यांनी आपले विचार व्यक्त केले. मोहोळ भाजपाचे तालुकाअध्यक्ष सुनील चव्हाण, मीडिया सेलचे संजीव खिलारे, प्रज्ञावंत प्रकोष्ठचे जिल्हा सहसंयोजक अविनाश पांढरे, तालुका सरचिटणीस महेश सोहनी, मुजीब मुजावर, विष्णू चव्हाण, शहराध्यक्ष व माजी नगरसेवक सुशील क्षीरसागर, तालुका उपाध्यक्ष माउली भगरे, किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष फंटू गोफणे, अनुसूचित मोर्चाचे तालुकाध्यक्ष दीपक गवळी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष गणेश झाडे, अनुसूचित मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष नागेश क्षीरसागर, अंकुश अवताडे, औदुंबर वाघमोडे, मधुकर पाटील, बाळू क्षीरसागर आदिसह भाजपा जिल्हा, तालुका व शहर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दीपकआबांची शिष्टाई ; म्हसोबा यात्रेत पुन्हा रोषणाई

सुराज्य/सांगोला

**वीज वितरण कंपनीने सर्व व्यापारी आणि अनेक छोट्या मोठ्या दुकानदार व व्यावसायिकांना वीज देण्याची तयारी दर्शवत तात्काळ कार्यवाही केल्याने पुन्हा एकदा भाविक भक्त तसेच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले. दीपकआबांनी शिष्टाई केल्यामुळेच म्हसोबा यात्रेत पुन्हा एकदा रोषणाई संचारली.**

संपूर्ण महाराष्ट्रात जनावरांच्या आजारासाठी प्रसिध्द असणारी जवळा (ता. सांगोला) येथील श्री म्हसोबा यात्रा कोरोनाच्या अडचणींमुळे दोन वर्षांनी पुन्हा एकदा त्याच उत्साहाने भरली आहे. या यात्रेला महाराष्ट्रातील सोलापूर सांगली सातारा कोल्हापूर जिल्ह्यातून तसेच कर्नाटकातील विजापूर बेळगाव आणि अन्य भागातून हजारो भाविक आणि व्यापारी येतात.

दोन वर्षांनी भरलेली यात्रा यंदा त्याच उत्साहाने भरली असताना अचानक वीज वितरण कंपनीने यात्रेतील एकही दुकानदार किंवा व्यापारी बांधवाने महावितरणकडे विशिष्ठ



अनामत रक्कम ठेवून अधिकृत वीज जोडणी केली नाही म्हणून सर्वांचीच वीज तोडली. आणि जणू संपूर्ण यात्रा काळोखात बुडून गेली.

दोन वर्षांनी होणारी यात्रा यंदा वीज वितरण कंपनीने कनेक्शन बंद केल्याने होणार की नाही.? अशी परिस्थिती निर्माण झाली असता ही बाब जनसेवेसाठी नेहमीच तत्पर असणाऱ्या आमदार दिपकआबा साळुंखे-पाटील यांना जवळा येथील प्रसिद्ध व्यापारी शहाजहान अत्तार यांनी कळवली. व्यापारी आणि प्रशासन यांच्यातील संघर्षमुळे हजारो लाखो भाविक भक्तांच्या आनंदावर विरजण पडणार की काय...? अशी परिस्थिती निर्माण झाली.

आबांनी तात्काळ समयसूचकता दाखवत वीज वितरण कंपनीचे अधिकारी गोसावी आणि त्यांचे कर्मचारी यांच्याशी चर्चा करून जवळा येथील म्हसोबा यात्रा हा येथील लोकांच्या केवळ उदरनिर्वाहाचा नव्हे तर अस्मितेचा विषय आहे. जवळ्याचा म्हसोबा हे सांगोला तालुक्यातील नव्हे तर आसपासच्या जिल्ह्यातील असंख्य भाविकांचे आराध्य दैवत आहे. असंख्य लोकांचे श्रद्धास्थान असलेल्या म्हासोबाची यात्रा दोन वर्षांनी पुन्हा भरत आहे.

या यात्रेत जनावरांचा बाजार, खेळणी, भांडी कपडे मिठाई लहान मुलांचे पाळणे खाद्य पदार्थांचे स्टॉल आदी दुकानदार आपली असंख्य स्वप्न घेऊन त्यांनी यात्रेत आपली दुकाने थाटली आहेत.

म्हणून वीज वितरण कंपनीने नियमावर बोट ठेवून भाविकांच्या श्रद्धा आणि व्यापारी बांधवांच्या स्वप्नांचा चुराडा करू नये पुढील वर्षीच्या यात्रेत प्रत्येक व्यापाऱ्यांनी यात्रा सुरू होण्यापूर्वी स्वतःहून अधिकृत वीज जोडणी करून घ्यावी त्यासाठी प्रसंगी आपण पुढाकार घेऊ, अशी दिपकआबांनी भूमिका घेऊन वीज वितरण कंपनीला पुन्हा त्यांना वीज जोडणी सुरू करावी अशी विनंती केली. सामान्य भाविक भक्त आणि महाराष्ट्रासह परराज्यातून आलेल्या व्यापारी बांधवासाठी भूमिका घेणाऱ्या दिपकआबांच्या विनंतीचा मान राखला.



## सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिला आज उच्च पदावर : शितलदेवी

सुराज्य/अकलूज

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अथक परिश्रमातून महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली झाली त्यामुळे आज महिला उच्च पदे गाठताना दिसत आहेत. त्यांचा आदर्श विचार घेऊन महिलांनी उच्च पदे पदांक्रांत केली पाहिजेत, असे मत डॉटर्स मॉम फाउंडेशनच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते -पाटील यांनी व्यक्त केले.**

माळेवाडी-अकलूज येथे सोलापूर जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सुनंदा फुले यांनी आयोजित केलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९२ व्या जयंतीनिमित्त 'आम्ही सावित्रीच्या लेकी' या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी त्यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या कार्यक्रमास बहुसंख्येने महिला या सावित्रीचा वेश परिधान करून आल्या होत्या. यावेळी मोहिते पाटील पुढे म्हणाल्या की, 'अठराव्या शतकात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी ज्ञानाची गंगा सर्वसामान्य गोरगरीबांच्या घराघरात पोहचवली. स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली. 'चूल आणी मूल' या समाजातील संकल्पनेला विरोध करून मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. त्याचाच परिणाम आज २१ व्या शतकात मुली सर्वच क्षेत्रात उंच भरारी घेत आहेत. आज महिल सर्वच क्षेत्रात आघाडीवर असून स्त्रिया स्वकर्तृत्वान बनल्या आहेत.

यावेळी झालेल्या बहारदार कार्यक्रमात बासरी वादन करून बोरगाव येथील सुप्रसिध्द बासरी वादक प्रविण साठे यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले,लहान मुलांची भाषणे, आरोग्य विषयक महिलांना माहिती ओवी गवळण गायन आदी कार्यक्रम सादर करण्यात आले होते. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. अष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई, राज्यस्तरीय काव्यलेखन पुरस्कार २०२२ प्राप्त झाल्याबद्दल ललितागौरी राणे, प्रतिभा गोडसे यांचा सत्कार प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सुलभा फुले, रतन अनंत कवळस, राणी एकतपुरे, प्रतीक्षा एकतपुरे अंगणवाडी सेविका व मदतनीस जिल्हा परिषद आरोग्य विभाग केंद्राचे डॉक्टर सिस्टर आशा वर्कर यांचे विषयी सहकार्य लाभले तसेच उपजिल्हा रुग्णालयाच्या सिस्टर सुरेखा केदारे तनुजा केंजळे सुनीता भालेराव उपस्थित होते. विशेष सहकार्य बाळासाहेब एकतपुरे, भाजपा ओबीसी मोर्चा सेलचे तालुकाध्यक्ष शंकरराव काकुळे, प्राध्यापक बलभीम काकुळे या कार्यक्रमास लाभले. या कार्यक्रमास परिसरातील बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

## सागर चव्हाण यांची शहराध्यक्षपदी निवड

सुराज्य/उत्तर सोलापूर

अखिल भारतीय छावा संघटनेच्या सोलापूर शहराध्यक्षपदी सागर चव्हाण यांची निवड केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे, विजयकुमार घाडगे यांच्या आदेशानसार जिल्हा अध्यक्ष अमोल पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी सनराइज् पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष हनुमंतराव चव्हाण, छावा संघटनेचे माजी तालुकाप्रमुख व युवा काँग्रेसची जिल्हा उपाध्यक्ष प्रा. निलेश गायकवाड, सागर चव्हाण, महेश माने, प्रवीण कदम, प्रमोद कांबळे, शिवम मोरे, रियाज तांबोळी, विकास येळणे, शहाबाज अन्सारी, ओम गायकवाड, रघुनाथ गायकवाड, समर्थ पवार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोनाली दिवटेचे यश

सुराज्य/वेळापूर

वेळापूर (ता. माळशिरस) येथील इ. ५ वी शिष्यवृत्ती परिक्षेत इंग्लिश स्कूल, वेळापूर प्रशालेतील विद्यार्थीनी सोनाली प्रशांत दिवटे हिने २२८ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत येण्याचा बहुमान पटकाविला आहे.



यशस्वी विद्यार्थिनीला बावचे एन. जी, खतिब झेड. एम., भुसारे एन. एस, देवकते जे. ए., बाबर आर. के. यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी तिला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा संस्थेचे अध्यक्ष ड. ॲड. सुजित कदम, सचिवा प्रियदर्शनी कदम- महाडिक, दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुभाषराव कदम, संस्थेच्या स्कूल ॲडमिनिस्ट्रेटर डॉ. मीना कदम, उपप्राचार्या तेजस्विनी कदम, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन प्रतापराव पाटील, रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष मिंलिद सरतापे, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, वेळापूर गावचे सरपंच रजनीश बनसोडे, ग्रामपंचायत सदस्य संजयआबा मंडले, पत्रकार शिवाजी मंडले मुख्याध्यापक आर. बी. पवार, सुनील खंदारे, पर्यवेक्षक शिवशरण पठाण, सत्यजित बारुंगुळे, भास्कर बागल यांनी अभिनंदन केले.

## विक्रेत्यांच्या डोईवर सांगोला इनरव्हील क्लबची छत्री

सुराज्य/सांगोला

हातावर पोट असणारे अनेक महिला व पुरुष आपल्या प्रपंचाचा गाडा हाकण्यासाठी फळ विक्री, किरकोळ स्टेशनरी विक्री, सूप व दुरडी, केरसुणी विक्री व चप्पल दुरुस्ती करत असतात. उन्हातान्हात दिवस काढणाऱ्या या विक्रेत्यांच्या डोक्यावर आता इनरव्हिल क्लबचे 'छत्र' राहणार आहे. या सर्व विक्रेत्यांना सांगोला येथे मोफत छत्र्याचे वाटप करण्यात आले आहे.

सांगोला येथील वासूद चौकामध्ये वासूद-अकोलेचे सतीश सुखदेव केदार हे बोर विक्रीचा व्यवसाय करतात. तसेच विटा बँकेसमोर शाबिरा जहांगीर मनेरी या महिला किरकोळ स्टेशनरी विक्रीचा व्यवसाय करतात, तसेच नगरपालिकेजवळ श्री शिवाजी नाथा डांगे हे चप्पल दुरुस्तीचे काम करतात व भाजी मंडई आवारात विद्या विनोद वडतीले या सूप, दुरडी व केरसुणी विक्रीचा व्यवसाय करतात. आपल्या कुटुंबाला आर्थिक आधार देण्यासाठी ते उन्हातान्हात दिवसभर राबत असतात. याचा गांभीर्याने विचार करत सांगोला येथील इनरव्हील क्लबच्या महिला सदस्यांनी या सर्व विक्रेत्यांच्या डोईवर ऊन, पावसापासून संरक्षण करणारे 'छत्र' देण्याचा संकल्प केला. यानुसार सतीश सुखदेव केदार, शाबिरा जहांगीर मनेरी, शिवाजी नाथा डांगे, विद्या विनोद वडतिले यांना मोफत छत्र्यांचे वाटप करण्यात आले. यासाठी वासूद अकोला येथील रहिवाशी आबा चौगुले यांचे सहकार्य लाभले.

सदर प्रोजेक्टसाठी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा उमा उंटवाले, तसेच रोटरी क्लब चे अध्यक्ष दत्तात्रय पांचाळ व विकास देशपांडे तसेच सविता लाटणे, ट्रेझरर वर्षा बलाक्षे, रत्नप्रभा माळी, वनिता चव्हाण, कविता दिवटे, स्वाती मगर उपस्थित होते.

## हजरत ख्वाजा हाजी सैफुल मुलुक दर्गाह ट्रस्टतर्फे स्वामी यांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर

दक्षिण पोलीस ठाण्याचे हद्दीतील सर्वांना सोबत घेऊन कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवू आणि कायदा हातात घेणाऱ्याचे गय केली जाणार नाही, अशी ग्वाही अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी दिली. ते बुधवारी दक्षिण पोलीस ठाण्यात तालुक्यातील हैद्रा येथील हिंदू-मुस्लीम भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हजरत ख्वाजा हाजी सैफुल मुलुक दर्गाहच्यावतीने आयोजित सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

दरम्यान शाल, श्रीफळ, गुच्छ देऊन हैद्रा दर्गाह ट्रस्टीचे चेअरमन मिरासाब याकुबसाब मुजावर व व्हा.चेअरमन रफिक शिराजोद्दीन मुजावर यांच्या हस्ते स्वामी यांचा सत्कार



करण्यात आला.

पो. नि. स्वामी म्हणाले, 'मी यापूर्वी नागपूर, पुणे, सांगली आशा विविध भागात नोकरी केलेली आहे. त्या ठिकाणी अवैध धंदेवाईक, गुन्हेगार, कायदा हातात घेणाऱ्याचे मुसक्या आवळले आहे. तरी नागपूर, पुणे, सांगली या ठिकाणी सर्वसामान्य नागरिकांचा देखील मला चांगले सहकार्य लाभल्याने ही कौतुकास्पद बाब आहे. काहीही अडचणी आल्यास मी सर्व सामान्य नागरिकांच्या सोबत आहे. सर्वसामान्य नागरिकांनी बारीक-सारीक गोष्टींवर लक्ष ठेवून मला वेळच्या वेळी माहिती देत जावा. यामुळे ज्या त्यावेळी गुन्हा थोपटण्यास मदत होईल. वाळू, जुगार, मटका जेणेकरून अवैध सर्व धंद्याचे समूळ नष्ट करण्यासाठी मला सर्वांनी सहकार्य करावे, असे ते यावेळी आवर्जून आवाहन केले.

यावेळी हैद्रा येथील हिंदू-मुस्लीम भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हजरत ख्वाजा हाजी सैफुल मुलुक दर्गाह ट्रस्टीचे चेअरमन मिरासाब याकुबसाब मुजावर व व्हा. चेअरमन रफिक शिराजोद्दीन मुजावर, सेक्रेटरी बंदेनवाज मुजावर, वकील मुजावर, अ. रऊफ मुजावर, म. याकुबसाब मुजावर, अहमद मुजावर, बंदेनवाज शिराजोद्दीन मुजावर आदी उपस्थित होते.

## 'रमा राघव' आणि 'पिरतीचा वनवा उरी पेटला' मालिका भेटीला

सुराज्य/सोलापूर

'पिरतीचा वनवा उरी पेटला' रात्री १० वा. तर पैजेवर जग जिंकणारी 'रमा' आणि प्रेमाने जग आपलेसे करणारा 'राघव' यांची खट्याळ प्रेमाची तिखटगोड' गोष्ट रमा राघव रात्री ९.०० वा. येत आहेत. आपल्या भेटीला कलर्स मराठीवर.९ जानेवारीपासून तरुणाईच्या प्रेमाचा गंध महाराष्ट्रभर पसरणार हे नक्की.

'पिरतीचा वनवा उरी पेटला' चिन्मय मांडलेकर यांनी लिहिलेल्या या कथेची निर्मिती पोतडी प्रॉडक्शन्सने केली असून सावीची भूमिका रसिका वखारकर आणि अर्जुनची भूमिका इंद्रनील कामत साकारणार आहेत. रामा राघव रोहिणी निनावे लिखित मालिकेची निर्मिती क्रिएटिव्ह ट्रान्समीडिया यांनी केली आहे.

# सिद्धेश्वर बँकेच्या अध्यक्षपदी वाले, उपाध्यक्षपदी गंभीरे

सुराज्य/सोलापूर

येथील सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी प्रकाश संगप्पा वाले तर उपाध्यक्षपदी नरेंद्र महादेव गंभीरे यांची एकमताने निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी कुंदन भोळे यांनी जाहीर केले.

नुकतीच सिद्धेश्वर बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक पार पडली. यात बँकेचे मार्गदर्शक राजशेखर शिवदारे पुरस्कृत सर्व संचालक निवडून आले. सिद्धेश्वर बँकेच्या अध्यक्ष पदासाठी प्रकाश संगप्पा वाले यांचे नाव तुकाराम काळे यांनी सुचवले तर बाळासाहेब आडके यांनी त्यांला अनुमोदन दिले व उपाध्यक्ष पदासाठी नरेंद्र महादेव गंभीरे यांचे नाव सुचेता थोबडे यांनी सुचवले तर एम. के. पाटील यांनी त्यांला अनुमोदन दिले. या दोन्ही पदासाठी प्रत्येकी एक अर्ज आल्याने ही निवड अविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले.

निवडणूक अधिकारी कुंदन भोळे यांनी अध्यक्ष प्रकाश वाले व उपाध्यक्ष नरेंद्र गंभीरे व सर्व नूतन



संचालकाचे अभिनंदन केले. कुंदन भोळे यांनी शुभेच्छा आणि मनोगत व्यक्त केले.

सिद्धेश्वर सहकारी बँकेचा इतिहास व कामकाजाची सर्व लोकांना माहिती आहे. अनेक लोकांच्या आयुष्य उभारणीस बँकेने मदत केली आहे. बँकेच्या सर्व संचालकांमध्ये सकारात्मक चर्चा होत असतात. बँक चालवणे तारेवरची कसरत आहे. बँकेच्या कामकाजात निर्णय घेताना सर्व संचालकांनी सहभागी व्हावे. त्यांनी सभेमध्ये प्रश्न विचारावेत व बँकेच्या कामकाजाची माहिती करून घ्यावे. प्रशासनाचीही जबाबदारी मोठी आहे.

रिझर्व बँकेचे निर्णय सूचना संचालकांनी समजावून दयाव्यात. संचालक हे बँकेचे ट्रस्टी आहात कर्ज वाटप करताना कोणतेही हेतू न ठेवता चिकित्सा करून कर्ज वाटप केले पाहिजे. तसेच वसुलीसाठी हे सर्व संचालकांनी प्रयत्न करावेत असे मत व्यक्त केले.

या सभेत संचालक तुकाराम काळे, अशोक लांबतुरे, पशुपतीनाथ माशाळ, सूचेता थोबडे, रूपाली बिराजदार, मल्लिनाथ पाटील, भीमाशंकर म्हेत्रे, शिवानंद कोनापुरे, बाळासाहेब आडके, इरप्पा सालक़्क़ी, महेश सिंदगी, सिद्धेश्वर मुनाळे, प्रकाश हत्ती व बँकेचे सरव्यवस्थापक राम शर्मा, सहा. सरव्यवस्थापक संजय घाळे हे उपस्थित होते.



## कन्हेरगांवच्या जिल्हा परिषद शाळेचा तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत प्रथम क्रमांक

**कुर्डूवाडी** : माढा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धमध्ये कन्हेरगांव तालुका माढा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चा खो-खो स्पर्धेत मुले मोठा गट यांचा संघ प्रथम क्रमांक पटकावला असून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी या संघाचे निवड झाली आहे. कबड्डी स्पर्धमध्ये ही या शाळेने मोठा गट मुले उपविजेता ठरला आहे, तर वैयक्तिक २०० मीटर मध्ये रोहन चव्हाण तालुक्यात दुसरा आला आहे. कुर्डू तालुका माढा येथील प्रगती हायस्कूल येथे या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व खेळाडूंचे मुख्याध्यापक किशोरकुमार बगाडे, क्रीडा शिक्षक मोतिराम शिंदे, दिनेश उरमोडे, शिवदास कुबेर, जोतिराम केदार, प्रमोद शिंदे, गायकवाड, साळुंके यांनी अभिनंदन केले.



## अर्जुन गायकवाड यांचा सत्कार

**अकलूज** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बागेची वाडी ता.माळशिरस शाळेचे माजी विद्यार्थी तथा बागेची वाडी गावचे सुपुत्र अर्जुन संजय गायकवाड यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील उत्कृष्ट यशातून महाराष्ट्र शासनाच्या सायबर गुन्हे विभागामध्ये वैज्ञानिक अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बागेची वाडी शाळेतर्फे सन्मान करण्यात आला. यावेळी अर्जुन संजय गायकवाड यांनी सर्व विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करून सावित्रीबाई फुले यांचा जीवन परिचय करून दिला यावेळी सर्व विद्यार्थ्यांना. अर्जुन गायकवाड यांनी खाऊवाटप करण्यात आला. शाळेच्या कोणत्याही प्रकारच्या अडचणीसाठी मी सदैव तत्पर असेल अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली. यावेळी दत्तात्रय गायकवाड, अमोल चव्हाण यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक अभिमान गायकवाड व सहशिक्षक सिताराम ढेकळे उपस्थित होते.

## अजित पवारांच्या विरोधात अक्कलकोट भारतीय जनता पक्षाच्यावतीने निषेध

**अक्कलकोट** : धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह भाष्य केल्याबद्दल अजित पवारांच्या विरोधात अक्कलकोट भारतीय जनता पक्षाच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांबद्दल संभाजी महाराज धर्मवीर नव्हतेच अशा आक्षेपार्ह भाष्य केल्याबद्दल भाजपा अक्कलकोटच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले, त्याप्रसंगी शहर अध्यक्ष शिवशरण जोजन यांनी बोलताना म्हणाले ४० दिवस यातना भोगून धर्मासाठी ज्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांच्या बद्दल असले आक्षेपार्ह भाष्य केल्याबद्दल जाहीर निषेध ताबडतोब त्यांनी राज्यातील जनतेची माफी मागावी. त्याप्रसंगी यशवंत धोंगडे, महेश हिंडोळे, सुरेखा होळीकट्टी, प्रभाकर मजगे, मोतीराम राठोड, आप्पासाहेब पाटील, दयानंद बिडवे, रमेश कापसे, नन्नू कोरबू, शिवशंकर स्वामी, देविदास गवंडी, सचिन पवार, संजय राठोड, राजू थंब, संकेत कुलकर्णी, निखिल पाटील, ओंकार कांबळे,जगन्नाथ राठोड, राहुल वाडे, राहुल काळे, रशिद खिरस्तके, दत्तात्रेय मुनाळे, तडवळ समेत पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी दत्तात्रय खंडागळे

**सांगोला** : विविध सामाजिक उपक्रम राबवून गेली तीन ते चार वर्षात सामाजिक बांधिलकी जपत असलेल्या आणि पत्रकारितेतून निर्भीड पणे सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडत असलेल्या महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या तालुका अध्यक्ष पदी दैनिक सकाळचे तालुका प्रतिनिधी दत्तात्रय खंडागळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संघटनेचे मावळते अध्यक्ष जेष्ठ पत्रकार मोहन मस्के यांचा अध्यक्ष पदाचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने नूतन कार्यकारणीची निवड करण्यासंदर्भात दैनिक मानदूत एक्सप्रेस कार्यालयात मोहन मस्के यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल देशपांडे राजेंद्र यादव अशोक बनसोडे संजय बाबर दिलीप घुले दत्तात्रय खंडागळे मिनाज खतीब दीपक भाकरे प्रवीण घोंगडे आनंद दौंडे सिद्धेश्वर माने गुलाम गौस तांबोळी आदीसह संघटनेचे सर्व पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. आगामी पत्रकार दिनाच्या निमित्त नूतन कार्यकारणी निवड व पत्रकार दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी सदरची बैठक आयोजित केली होती. संघटनेच्या तालुका अध्यक्ष पदासाठी दैनिक सकाळचे पत्रकार दत्तात्रय खंडागळे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे बैठकीचे अध्यक्ष मोहन मस्के यांनी जाहीर केले. तसेच सचिव पदासाठी मिनाज खतीब कार्याध्यक्ष पदासाठी आनंद दौंडे व उपाध्यक्ष पदासाठी गुलामगौस तांबोळी यांचे एकमेव अर्ज आल्याने सर्व पदाधिकारी निवडी एकमताने संपन्न झाल्या.

## पंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्या वतीने विवेक वर्धिनीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पंढरपूर** : शहर पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन दिनानिमित्त पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण फुगे साहेब यांचे मार्गदर्शनाने विवेक वर्धिनी विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शिबिर ठेवण्यात आले होते. यावेळी पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक व निर्भया पथक प्रमुख श्री प्रशांत भागवत साहेब यांनी पोलिसांचे कार्य तसेच स्वसंरक्षण कसे करावे, पोलिसांचे कार्य कसे चालते, त्याचबरोबर वापरली जाणारी शस्त्रे त्यांची रचना व कार्य त्या साहित्याची ओळख, त्याचबरोबर निर्भया पथकाचे कार्य विशेषतः मुलींनी सोशल मीडियावरील होणाऱ्या ब्लॅकमेलिंग व फसवणुकीपासून कसे दूर राहावे या संदर्भात अतिशय सखोल अशी माहिती दिली या कार्यक्रमासाठी पोलीस नायक प्रसाद आवटी, पोलीस कॉन्स्टेबल निलेश कांबळे, अविनाश रोडगे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विवेकवर्धिनीचे प्राचार्य राजेंद्र पाराध्ये, उपमुख्याध्यापक तुकाराम कौलगे, पर्यवेक्षक सुनील पाटील,यांनी नियोजन केले. कार्यक्रम स्थळी क्रीडाशिक्षक महादेव रणदिवे, शिवाजी येडवे, राजूभाई मुलाणी, राजन शिंदे, संजय क्षीरसागर, म्हेत्रे, सतीश भंडारे, पोपट काळेल, देविदास चेळकर, भारत झांबरे, अनिल भरले, सिताराम मासाळ, सुतार, वसंत सातपुते, गुरव एस.एच, श्रीकांत चव्हाण, निकम, कांबळे उपस्थित होते.

### वेदत्री व्हेंचर एलएलपी कंपनमिधील गुंतवणूकदारांची फसवणूक

# ८६ लाखांचा गंडा, आरोपींना ७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी

**सुराज्य/नातेपुते**

**वेदत्री व्हेंचर एलएलपी या कंपनीने गुंतवणुकदारांना मोठ्या रकमेचा परतावा देतो असे सांगूनही नोटरी कराराप्रमाणे गुंतवणूक रकमेची परतफेड केली नाही. एकूण ८६ लाख ७० हजार ७९८ रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार वेदत्री वेंचर कंपनीचे मालक संतोष दत्तू गुरव व विजय वसंत क्षीरसागर (दोघेही रा कोथळे ता माळशिरस) व सचिन गेनू फुले (रा.मोरोची, ता.माळशिरस) यांच्याविरुद्ध नातेपुते पोलीस ठाणे येथे दाखल झाल्याने त्यानुसार गुन्हा दाखल करून आरोपीला न्यायालयात हजर केले असता ७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.**

अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ बसवराज शिवपुजे यांनी सांगितले की, या गुन्ह्याच्या तपासा दरम्यान आरोपी



संतोष गुरव व विजय क्षीरसागर यांचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना गुन्ह्याच्या तपासाकामी २ जानेवारी रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपींना माळशिरस येथील सत्र न्यायालय हजर केले असता ७ जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली. सोलापूर जिल्हा व इतर जिल्ह्यातील नागरिकांना अकलूजचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांनी आवाहन केले आहे की, ज्या नागरिकांनी वेदत्री व्हेंचर एलएलपी कंपनी नातेपुते गुंतवणूक केली असेल व ज्यांची फसवणूक झालेली असेल अशा गुंतवणूकदारांनी उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज कार्यालय येथे संपर्क साधावा तसेच या




प्रकारच्या आकर्षक लाभ देणाऱ्या स्कीम पासून सावध राहावे. कमी वेळेत जास्त नफा असल्या भूलथापांना बळी पडू नये, असा कोणताही प्रकार चालू असेल तर आपल्या नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. आरोपींना अटक करणे कामे जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ बसवराज शिवपुजे यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक नातेपुते संपागे पोलीस हेडकॉन्स्टेबल समाधान देशमुख, गणेश निंबाळकर, विकि घाडगे, दत्ता खरात, सचिन भोसले, अजित कडाळे, अनवर आतार यांनी कामगिरी बजावली.

## क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाचा प्रश्न मार्गी लावणार : मोहिते-पाटील

**सुराज्य/अकलूज**

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणाची राजधानी असलेल्या अकलूजमध्ये आद्य क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांचा पुतळा व स्मारक उभारावे अशी मागणी सचिनभाऊ साठे यांच्या मानवहित लोकशाही पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सज्जनभाऊ लोखंडे व लहुजी शक्ती सेनेचे संदीप खंडागळे यांच्या नेतृत्वाखाली अकलूजमधील मातंग समाजाच्या वतीने भाजपाचे नेते धैर्यशील मोहिते पाटील यांच्याकडे करण्यात आली. तेव्हा अकलूज नगरपरिषदेची निवडणूक होताच पहिल्याच मिटींगला लहुजी वस्तादांच्या पुतळ्याचा व स्मारकाचा प्रश्न मार्गी लावला जाईल असे आश्वासन धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिले.

आधुनिक भारताच्या सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्रांतीचे जनक लहुजी वस्ताद साळवे यांनी जगेन तर देशासाठी मरेन तर देशासाठी' अशी भीष्मप्रतिज्ञा करून अखंड ८७ वर्षे (आयुष्यभर) अविवाहित राहून तालीम, दांडपट्टा, लाठी काठी, तलवारबाजी, कुस्तीचे आखाड्यात प्रशिक्षण देऊन देशसेवेकरिता त्यांनी त्यांचे आयुष्य वाहिले. अशा महापराक्रमी लहुजींनी वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, उमाजी नाईक यांच्यासारखे असंख्य क्रांतीकारक घडवले. त्याच क्रांतीकारकांनी पुढे जाऊन लहुजी वस्ताद यांना गुरू मानून सशस्त्र क्रांतीचा लढा उभारला. त्याचबरोबर महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनीही त्यांना गुरूस्थानी मानले होते व देशातील पहिली शाळा सुरू केली होती.



अशा थोर क्रांतीपिता क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा पूर्णाकृती पुतळा व स्मारकासाठी अकलूज येथे जागा उपलब्ध करून मातंग समाजाची अस्मिता राखून त्या स्मारकामधून सर्व समाजबांधवांनी प्रेरणा घ्यावी यासाठी धैर्यशील मोहिते पाटील यांनी आपल्या स्तरावर हा विषय तात्काळ मार्गी लावून समाजाला न्याय द्यावा अशा आशयाचे निवेदन समाजाच्या वतीने मानवहित लोकशाही पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिनभाऊ साठे यांच्या मार्गदर्शनाखाली पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सज्जनभाऊ लोखंडे, लहुजी शक्ती सेनेचे संदीप खंडागळे, मानवहित लोकशाही पक्षाचे माळशिरस तालुका उपाध्यक्ष पिंटू लोखंडे, आधुनिक लहुजी शक्ती सेनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष महादेव तुपसौंदर, रणजित मोहिते, आकाश साळुंखे, दादा गायकवाड, बापू मोहिते, बाळू एकतपुरे, देविदास लोखंडे यांच्यासह अनेक समाज बांधव व भगिनींनी दिले आहे. त्यांच्या या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन यासाठी जागेची पाहणी करण्याचे निर्देश धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिले आहेत. त्यामुळे लवकरच अकलूजमध्ये आद्य क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांचे भव्य स्मारक उभे राहील याबाबत मातंग समाजातून आशावाद व्यक्त केला जात आहे.

## गिड्डेवाडीतील विद्यार्थ्यांसाठी आनंद बाजाराचे आयोजन

**मोडनिंब** : विद्यार्थ्यांना गणित संकल्पना स्पष्ट समजाव्यात व्यवहार व शिक्षण याची सांगड घातली जावी, शाळेचा सामाजिक सलोखा निर्माण व्हावा यासाठी गिड्डेवाडी येथे शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, प्राथमिक शाळा, व अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने बाल आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. बाजाराचे उदघाटन अनगर बिटचे विस्ताराधिकारी विकास यादव यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी बालव्यापा-यांनी बाजारात शेतातील भाजीपाला, फळे, स्टेशनरी,किराणा साहित्य, खायचे वेगवेगळे पदार्थ विक्री साठी मांडले होते. बालक व त्यांचे पालक यांच्यात मोठा उत्साह दिसून येत होता. या बालबाजार कार्यक्रमासाठी सरपंच प्रतिनिधी विकास गिड्डे, माजी ऊपसरपंच पोपटदाजी गिड्डे, सौदागर गिडडे, सिद्धेश्वर गिडडे, धर्मराज गिडडे, मोहन कोकाटे, धनाजी गिडडे, अरुण गिडडे, अच्युत गिडडे, भास्कर पवार, दत्तात्रय गायकवाड, नितीन गिडडे, संतोष खोत, शितल गिडडे, पांडुरंग मोरे, राजू माने, शहाजान सय्यद, दीपक तांबिले, सुखदेव गिडडे, विशाल गिड्डे, गणेश गिडडे, अक्षय पवार, संतोष गिडडे किरण गिड्डे, नंदकुमार गिड्डे, दादा मोरे, बाळु सपकाळ, संभाजी गिडडे, अतुल पवार यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.

# ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी





### महात्मा फुले प्रतिष्ठान

**माढा** : माढ्यातील महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी सावित्रीमाई फुले यांनी तत्कालीन काळात त्रास सहन करीत स्त्रीशिक्षणाच्या माध्यमातून महिला सबलीकरणास प्रारंभ केल्याने आज महिला सक्षम बनल्याचे गौरवोद्गार काढले. याप्रसंगी श्री संत कुर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे सपोनि श्याम बुआ जिल्हा दुध संघाचे माजी संचालक राजेंद्र चवरे पाणीपुरवठा सभापती नितीन साठे आरोग्य सभापती विकास साठे बांधकाम समिती सभापती अरूण कदम मुख्याधिकारी चरण कोल्हे महात्मा फुले प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक अजिनाथ माळी शहाजी साठे गुरुराज कानडे डॉ सोमेश्वर टोंगळे उपाध्यक्ष डॉ हनुमंत क्षीरसागर नगरसेविका गितांजली देशमुख निर्मला थोरात रेश्मा लंकेश्वर सुनिता राऊत वंदना लंकेश्वर शबाना बागवान आदित्य भांगे अर्चना राऊत डॉ विद्या क्षिरसागर विद्या राऊत विमल देवकर राध देवकर डॉ सुभाष पाटील शिवाजी जगदाळे दिनेश जगदाळे शहाजी चवरे नागनाथ घाडगे केंद्रप्रमुख सुरेश माळी दत्तात्रय अंबुरे परमेश्वर पुजारी धोंडीराम राऊत वैजिनाथ राऊत, संतोष राऊत, संग्राम राऊत उपस्थित होते. प्रास्ताविक रामहारी वहिल यांनी तर सूत्रसंचालन दत्तात्रय चवरे व प्रतिष्ठान चे सचिव लक्ष्मण राऊत यांनी केले.

### चिखली ग्रामपंचायत

**चिखली** : ग्रामपंचायत चिखली (या मोहोळ) येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच बाळू मेंढे, माजी सरपंच युवराज शिंदे, ग्रा.प .सदस्य राजाराम सिरसट, मरिबा कोळी, हणमंत चौधरी, हनुमंत सिरसट, विष्णू कोळेकर, यांच्या सह गावातील नागरिक उपस्थित उपस्थित होते. या प्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या जीवनाबद्दल व त्यांनी अथक परिश्रमातून शिक्षणाचा कसा अधिकार मिळवून दिला, या बद्दल ग्रामसेवक माधुरी वसेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले .

### खंडाळी जि. प. शाळा

**वेळापूर** : बालिका दिनाचे औचित्य साधून जि प शाळा खंडाळीने नाविन्यपूर्ण पद्धतीने बालिका दिन उत्साहात साजरा केला. मुख्याध्यापक सारीका महाजन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. छाया पोळ यांनी माहिती सांगितली.

### महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय

**वेळापूर** : क्रांतीज्योती सावित्रिबाई फुले यांच्या जंयती निमित्त क्रांतीसुर्य महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय वेळापूर यांच्या वतीने जिल्हा परिषद प्रथमिक शाळा बनकर वस्ती व अंगणवाडी येथील विद्यार्थांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रंथपाल अजित बनकर, सौरभ बनकर, सागर एकतपूरे, प्राथमिक शाळेच्या शिक्षिका अनिता वाघ, अंगवाडीच्या राणी गाढवे, ज्योती बनकर, रूपाली बनकर, कोमल म्हेत्रे, निलम एकतपूरे उपस्थित होते.

### मळोली ग्रामपंचायत

**वेळापूर** : स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या पहिल्या महिला शिक्षिका, सामाजिक कवितांची परंपरा रुजविणाऱ्या कवयित्री व थोर समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंत्तिनिमीत्त मळोली ग्रामपंचायतीच्या वतिने अभिवादन करण्यात आले. यावेळी पं. स. सदस्य रणजितसिंह जाधव, उपसरपंच महादेव पवार, ग्रामपंचायत सदस्य संतोष जाधव, विजय पाटील, शब्बीर मुजावर, सुरेश जाधव, दिलिप जाधव, अजीत ईंगोले, अमोल महाडीक, समाधान वाघमारे, मिलींद जाधव, सोमनाथ काटकर, दत्तात्रय पाटील, विशाल कांबळे, दिपक जाधव व ईतर उपस्थीत होते .

### मार्डी ग्रामपंचायत

**उत्तर सोलापूर** : तालुक्यातील मार्डी ग्रामंचायत मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच प्रांजली गणेश पवार यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ कदम, संजय इनामदार,श्रीकांत मार्तंडे, नागेश भालेराव, सरोजिनी जगताप,तबस्सुम शेख,कमल बोराडे, गणेश पवार, अझरोदीन शेख, भानुदास बोराडे, बाबुराव राजमाने,सैफन पटेल, सुनिल मुडके,जयदत्त मार्तंडे,शत्रुघ्न गोडसे, आप्पा शिंदे,विशाल सुभेदार,यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन व आभार विष्णू जगताप यांनी मानले.

### कुसूर उपकेंद्र

**दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे आरोग्यवर्धिनी केंद्र अंतर्गत येत असलेल्या कुसुर उपकेंद्र येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



करण्यात आली.त्याच बरोबर आशा डे सुध्दा साजरा करण्यात आलायावेळी सर्व आशांना पुष्पगुछ देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी भंडारकवठे आरोग्यवर्धिनी केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.ऋषभ कांबळे,आरोग्य सहायक गिरीष जेटगी,आरोग्य सेविका सुनिता वारे, आरोग्य सेवक संजय कमळे,आरोग्य सेविका गिरीजा उमराणी,कलावती गुरव,लिंबवा नरोटे, महानंदा पाटकळे, आरती याडगे, सुनिता स्वामी,राणी कोळी या सर्व आशा कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

### टेंभुर्णीतील सावता परिषद

**टेंभूर्णी** : टेंभुर्णी शहारामध्ये सावता परिषदेच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती मोठ्या ऊत्सहात साजरी करण्यात आली. सावता परिषदेचे प्रदेश संघटक बाळासाहेब ढगे यांच्या पुढाकाराने सावित्रीमाई फुले यांच्या फोटो चे पूजन. योगेश बोबडे भारतीय जनता पार्टी माढा तालुका अध्यक्ष व शिवसेना माढा तालुका अध्यक्ष मधुकर देशमुख व राष्ट्रवादी काँग्रेस उद्योग व व्यापार सोलापूर जिल्हा अध्यक्ष मयूर काळे, शिवसेना टेंभुर्णी शहर अध्यक्ष सुरेश भाऊ लोंढे, आर.पी.आय जिल्हा अध्यक्ष जयवंत पोळ, भारतीय जनता पार्टी टेंभुर्णी शहर अध्यक्ष नागनाथ वाघे, टेंभुर्णी ग्रामपंचायत विद्यमान सदस्य भाऊसाहेब महाडिक तसेच ग्रामपंचायत सदस्य गिरीश ताबे यांच्या उपस्थित होते. यावेळी १०८ रक्तदात्यानी उत्स्पूर्त प्रतिसाद दिला. सुनील शेलार, सागर ढगे, सोमनाथ जाधव, विजय ढगे, सूर्यकांत साळुंखे, आकाश ढगे, अक्षय ढगे, महेश शिंदे, आनंद ढगे, शुभम मस्के, सागर कुटे, योगेश शिंदे, अभिषेक ढगे, ज्ञानेश्वर पेटकर, अक्षय खोडवे संजय बारवे, रमेश भानवसे, प्रसाद इंगळे, अविनाश लाडूळे, बाळासो ढगे, किरण ढगे, प्रतिक ढगे, प्रसाद ढगे,सचिन गोरे, अमोल कदम यांच्या उपस्थितीत पार पडला.

### महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्था



**वैराग** : गुळपोळी येथील महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष लक्ष्मी केशव भालेराव ग्रामपंचायत सदस्या (ताडसौदणे) तर प्रमुख पाहुणे स्वाती अशोक गायकवाड ग्रामपंचायत सदस्या तर प्रमुख उपस्थित प्रकाश शिंदे , अशोक गायकवाड हे होते.त्यावेळी प्रमुख पाहुणे स्वाती अशोक गायकवाड ग्रामपंचायत सदस्या आणि लक्ष्मी केशव भालेराव ग्रामपंचायत सदस्याच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला.त्यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भैरवनाथ चौधरी खजिनदार अशोक गायकवाड सहसचिव आशा आण्णासाहेब भालशंकर, दिक्षा भालशंकर, किरण खुरंगळे , रंजना खुरंगळे, सुभद्रा चौधरी , प्रकाश शिंदे, स्वाती गायकवाड, लक्ष्मी भालेराव उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण खुरंगळे यांनी तर आभारप्रदर्शन भैरवनाथ चौधरी यांनी केले केले.

# अनिल परब यांची संपत्ती जप्त

✔ सुराज्य/मुंबई

**सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) राज्याचे माजी मंत्री आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांच्या १०.२० कोटी रुपयांची मालमत्तेवर तात्पुरती जप्ती आणली आहे. जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेमध्ये रत्नागिरीतील ४२ गुंठे जमीन व त्यावर बांधण्यात आलेल्या साई रिसॉर्टचा समावेश असून, त्याची किमत ७ कोटी ४६ लाख ४७ हजार असल्याचे समजते.**

पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालयाने अनिल दत्तात्रय परब, मेसर्स साई रिसॉर्ट, मेसर्स सी शंख रिसॉर्ट आणि इतरांविरुद्ध दापोलीतील न्यायदंडाधिकाऱ्यांकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे ईडीने आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) तपास सुरू केला आहे. पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या कलमांचे उल्लंघन झाल्याने अनिल परब आणि इतरांविरुद्ध राज्य सरकारची फसवणूक आणि नुकसान केल्याबद्दल दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ईडीने सविस्तर परिपत्रकही जाहीर केले आहे.


ईडीने यासंदर्भात जाहीर केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे की, अनिल परब यांनी साई रिसॉर्टशी संबंधित परवानग्या मिळवताना स्वतःची मालक म्हणून ओळख लपवली. विभास साठे नावाच्या व्यक्तीच्या नावाने सर्व परवानग्या अनिल परब यांनी मिळवल्या, असे या प्रेस नोटमध्ये सांगण्यात आले आहे. तसेच ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र सरकारची फसवणूक करून परवानग्या मिळवल्या गेल्या. त्यामुळेच ईडीने मुरुड दापोली मधली ४२ गुंठे जमीन आणि साई रिसॉर्टची मालमत्ता जप्त केल्याचे सांगण्यात येत आहे.

या जमिनीची किंमत २ कोटी ७३ लाख ९१ हजार रुपये असून अलिबाग येथे बांधण्यात आलेल्या साई रिसॉर्ट एनएक्सची किंमत ७ कोटी ४६ लाख ४७ हजार रुपये आहे, अशी माहिती ईडीकडून देण्यात आली.

भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी ३१ डिसेंबर रोजीच ट्विट करत ठाकरे गटाचे नेते आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांची यादी जाहीर केली होती. या नेत्यांवर नव्या वर्षात मोठी कारवाई होणार, असेही त्यांनी जाहीर केले होते. त्यानुसार आता अनिल परब यांच्यावर पहिली कारवाई झाली आहे.



## महावितरणसारख्या कंपनीची आपल्याला गरज नाही : पाठक



✔ सुराज्य/मुंबई

**अदानी वीज कंपनीला वीज वितरणाचा परवाना देऊ नये आणि वीज क्षेत्राचे खासगीकरण थांबवावे, या मागणीसाठी राज्यात वीज कर्मचाऱ्यांनी तीन दिवसीय संप पुकारला. यानंतर राज्यभरात ठिकठिकाणी वीज पुरवठा विस्कळीत झाला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे (MSEB) संचालक आणि भाजपा समन्वयक विश्वास पाठक यांनी मोठे विधान केले. वीज क्षेत्रात क्रांती होऊन महावितरणसारखी कंपनी आपल्याला लागणारही नाही, असे मत विश्वास पाठक यांनी व्यक्त केले.**

विश्वास पाठक म्हणाले, 'उर्जा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात क्रांती होत आहे. प्रत्येक घर आपली घरासाठीची उर्जा कशी निर्माण करता येईल याचा प्रयत्न करत आहे. याचे उदाहरण म्हणजे सौरउर्जा आहे. हळूहळी ही क्रांती होऊन आपल्याला महावितरणसारखी कंपनी लागणारही नाही. ही वस्तुस्थिती आहे.'

## ग्रीन हायड्रोजन प्रोजेक्टला केंद्र सरकारची मंजुरी

✔ **सुराज्य/नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी ग्रीन हायड्रोजन प्रकल्पाला केंद्र सरकारने बुधवारी मंजुरी दिली. यासाठी १९,७४४ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. इलेक्ट्रोलायझर अक्षय ऊर्जा (रिन्यूएबल एनर्जी) व ग्रीन हायड्रोजनच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी सुमारे १७०० कोटी खर्च केले जाणार आहेत.

देशभरात ग्रीन हायड्रोजनची केंद्रे उभारणीसाठी ४०० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली. ग्रीन हायड्रोजन हा स्वच्छ ऊर्जेचा स्रोत आहे. हायड्रोजनच्या वापरामुळे प्रदुषण होत नाही. पाण्यातून हायड्रोजन आणि ऑक्सिजन वेगळे करुन ग्रीन हायड्रोजनची निर्मिती केली जाते. या प्रक्रियेत इलेक्ट्रोलायझरचा वापर केला जातो. सौर व पवन ऊर्जेचा यात समावेश असतो. रसायने (केमिकल), लोह, पोलाद, वाहतूक, हीटिंग व वीज यासाठी ग्रीन हायड्रोजनचा वापर केला जातो.

## मुंबईच्या विशेष पोलीस आयुक्तापदी देवेन भारती यांची नियुक्ती

✔ सुराज्य/मुंबई



आयपीएस अधिकारी देवेन भारती यांची बुधवारी गृह विभागाने मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. हे खास पद नव्यानेच तयार करण्यात आले आहे.

हे पद अपर पोलीस महासंचालक दर्जाचे असेल. मुंबई पोलीस आयुक्तांच्या अधिपत्याखालील पोलीस सह आयुक्तांच्या कामाचे अधिक प्रभावीपणे पर्यवेक्षण करता यावे म्हणून हे पद तयार केल्याचे गृह विभागाने शासन आदेशात स्पष्ट केले आहे. याचाच अर्थ मुंबईचे पाचही सह आयुक्त यापुढे थेट मुंबई आयुक्तांना रिपोर्टिंग न करता विशेष पोलीस आयुक्तांना रिपोर्टिंग करतील. मुंबई पोलीस आयुक्त आणि सह आयुक्तांमधील फळीत हे नवे पद तयार करून गृह विभागाने एका अर्थाने मुंबई पोलीस आयुक्तांची शक्ती काढून घेत विशेष पोलीस आयुक्तांना सुपर कॉप बनवले आहे. त्यामुळे मुंबई पोलीस दलात हे पद प्रभावी ठरणार आहे.

देवेन भारती हे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गुडबुकमधील अधिकाऱ्यांपैकी सर्वात जवळचे अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यामुळेच त्यांच्याकडे मुंबईच्या विशेष पोलीस आयुक्तपदाचा पदभार सोपवल्याचे म्हटले जात आहे.


## ऋषभ पंतला मुंबईत आणणार

✔ **सुराज्य/मुंबई**: भारतीय संघाचा यष्टिरक्षक ऋषभ पंत कार अपघातात गंभीर जखमी झाला आहे. या कार अपघातानंतर ऋषभ पंतवर डेहराडूनमधील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, आता पुढील उपचारांसाठी ऋषभला मुंबईत आणण्यात येणार आहे. दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनने (डीडीसीए) मोठा निर्णय घेतला आहे. भारतीय संघाचा यष्टिरक्षक ऋषभ पंत कार अपघातात गंभीर जखमी झाला आहे.

## जोगेंद्र कवाडे यांची शिंदे गटासोबत युती

✔ सुराज्य/मुंबई

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख जोगेंद्र कवाडे यांनी एकत्र पत्रकार परिषद घेऊन युती जाहीर केली आहे. एकनाथ शिंदे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला नाही आले.**



तळागळातून संघर्ष करत वर येणारे नेतृत्व आज महाराष्ट्राच्या प्रमुखपदी बसले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात उद्धव ठाकरे हे आमच्या निवेदनाची साधी दखलही घेत नव्हते, अशी टीका जोगेंद्र कवाडे यांनी आधीच्या महाविकास आघाडी सरकारवर केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'बाळासाहेबांच्या शिवसेनेसोबत जोगेंद्र कवाडे यांच्या पीपल्स रिपब्लिकन पक्षासोबत युती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचे आम्ही स्वागत करतो. जोगेंद्र कवाडे यांनी संघर्षाच्या काळात चळवळीत खूप मोठे योगदान दिलेले आहे. चळवळीसाठी त्यांनी सहा महिने तुरुंगवासही भोगला. कवाडे यांची आक्रमकता भल्याभल्यांना घाम फोडणारी होती. जोगेंद्र कवाडे यांचा लाँग मार्च आता योग्य ठिकाणी पोहोचला आहे, अशी मिश्किल टिप्पणी एकनाथ शिंदे यांनी यावेळी केली.'

## वीज कर्मचाऱ्यांचा संप मागे

✔ सुराज्य/मुंबई



**मंगळवारी मध्यरात्रीपासून वीज कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप मागे घेण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कामगार संघटनांमध्ये आज चर्चा पार पडली. या बैठकीत सकारात्मक तोडगा काढण्यात आला. वीज कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतल्याने राज्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा विभागाचे अधिकारी, महावितरण, महानिर्मिती, महापारेषण विभागाचे अधिकारी आणि विविध वीज कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सह्याद्री अतिथीगृहात बुधवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास बैठक झाली. या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित करताना म्हटले की, 'राज्य सरकारला वीज कंपन्यांचे कोणतेही खासगीकरण करायचे नाही. येत्या तीन वर्षात राज्य सरकार ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.' अदानी समूहाने समांतर परवान्यासाठी अर्ज केला. त्याच्या निषेधार्थ हा संप करण्यात आला होता. याबाबत बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, 'समांतर परवान्याबाबत महावितरण, सरकारने अर्ज वीज नियामक आयोगाकडे करायला हवे अशी भूमिका वीज कर्मचारी संघटनांनी मांडली होती. राज्य वीज नियामक आयोगाकडे आपल्या हिताचे निर्णय घेतला जाईल', अशी भूमिका सरकार घेईल, असे फडणवीस यांनी म्हटले.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे. कामगार संघटनांनी घेतलेली भूमिका ही राज्य सरकारची भूमिका असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या जनतेच्या हितासाठी हा संप पुकारला होता, असे महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अधिकारी, अभियंता संघर्ष समितीचे समन्वयक संजय ठाकूर यांनी सांगितले. बुधवारी सरकारसोबत झालेल्या चर्चेनंतर आमचे समाधान झाले आहे. सरकारने घेतलेल्या निर्णयाने, आश्वासनामुळे आमचे समाधान झाले असल्याचे वीज कर्मचारी संघटनांनी सांगितले.

## महाराजा यशवंतराव होळकर 'राज्याभिषेक दिन' सोहळ्यात सहभागी व्हा : भूषणसिंह

✔ सुराज्य/सोलापूर

### जन्मस्थळ वाफगावात होणार शाही सोहळा

**संपूर्ण हिंदुस्तानात इंग्रजांच्या विरुद्ध एक मोठा लढा उभारणारे महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) यांचा राज्याभिषेक दिन सोहळा ६ जानेवारी २०२३ (शुक्रवार) रोजी सकाळी ९ वाजता किल्ले वाफगाव (ता-खेड, जिल्हा-पुणे) येथे प्रति वर्षानुसार मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.**

या ऐतिहासिक सोहळ्यास संपूर्ण देशातून अनेक ऐतिहासिक घराण्यांचे वंशज, राजकीय, सामाजिक क्षेत्रात कार्यरत व्यक्ती-संघटना व नागरिक उपस्थित राहणार असून सर्वांनी गट-तट बाजूला ठेवून या ऐतिहासिक कार्यात सहभागी होण्याचे आवाहन होळकर घराण्याचे वंशज श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर यांनी केले आहे.



या सोहळ्यात गजी नृत्य, ढोल वादन, मर्दानी खेळ, शस्त्र अस्त्र प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, इतिहासिक व्याख्यान, इत्यादी या शाही सोहळ्याचे आकर्षण असणार आहेत.

३ डिसेंबर १७७६ रोजी महाराजा यशवंतराव होळकर यांचा जन्म वाफगावच्या किल्ल्यामध्ये झाला. पुढे अनेक लढायांमध्ये सहभागी होत त्यांनी आपल्या पराक्रमाचा परिचय दिला. पण १७९८-९९ मध्ये सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या निधनानंतर होळकर घराण्यावर मोठे संकट आले.

ज्या घराण्याने उत्तरेमध्ये स्वराज्याच्या सीमा अटकेपार नेल्या, त्या होळकर घराण्याला संपवण्याचे डाव रचले जाऊ लागले. कठीण काळात आपले कुलदैवत खंडोबाचे दर्शन घेऊन जेजुरीहून फक्त एक घोडा आणि अंगावरच्या वस्त्रानिशी बाहेर पडलेल्या महाराजा यशवंतराव होळकर यांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर आपले राज्य पुन्हा मिळवले व ६ जानेवारी १७९९ रोजी स्वतः चा राज्याभिषेक करून घेतला. ही बाब आजच्या तरुणवर्गासाठी प्रेरणादायी आहे की कोणतीही गोष्ट अशक्य नाही.

इथेच न थांबता राजस्थान, माळवा, पंजाब, दिल्ली अशा मोठ्या प्रदेशामध्ये महाराजांनी इंग्रजांविरुद्ध मोहीम सुरु करत देशातील सर्व राजा महाराजांना इंग्रजांविरुद्ध एकत्र येण्याचे आवाहन केले.

## भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक

✔ **सुराज्य/नवी दिल्ली** : भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) राष्ट्रीय कार्यकारिणीची दोन दिवसीय बैठक १६ आणि १७ जानेवारीला दिल्लीत होणार आहे. यामध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या कार्यकाळाला मुदतवाढ मिळण्याची शक्यता असल्याचे पक्षातील सूत्रांनी मंगळवारी सांगितले.

पक्षाच्या या मुख्य संघटनात्मक बैठकीत विविध राज्यांच्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या रणनीतीवर चर्चा केली जाणार आहे. त्यासोबतच पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावाही घेण्यात येणार आहे.

पक्षाध्यक्ष म्हणून नड्डा यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ या महिन्याच्या अखेरीस संपत आहे. आगामी निवडणुका लक्षात घेता त्यांना मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे.

## सोनिया गांधी रुग्णालयात दाखल



✔ सुराज्य/नवी दिल्ली

काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांना दिल्लीतील सर गंगाराम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. व्हायरल इन्फेक्शन झाल्याने त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. सोनिया गांधी यांच्यासोबत त्यांची मुलगी प्रियांका गांधी या होत्या.


प्रियांका गांधी या बुधवारी सकाळी सोनिया गांधी यांना घेऊन हॉस्पिटलमध्ये आल्या, अशी माहिती सूत्रांनी दिल्याचे एका वृत्तसंस्थेने म्हटले आहे. हॉस्पिटलने यासंदर्भात हेल्थ बुलेटीनही जारी केले. यूपीएच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांना बुधवारी सकाळी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. छातीशी संबंधित विभागात त्यांना दाखल करण्यात आले आहे. डॉ. अरुप बासू आणि त्यांची टीम सोनिया गांधींवर उपचार करत आहेत.

छातीत झालेल्या व्हायरल इन्फेक्शनमुळे सोनिया गांधी यांच्यावर उपचार सुरू असून त्या देखरेखीखाली आहेत, अशी माहिती सर गंगाराम हॉस्पिटलच्या व्यवस्थापक मंडळाचे प्रमुख डॉ. अजय स्वरुप यांनी दिली.

## इंजिनिअरिंगसह सर्व शिक्षण मराठीतून करणार : फडणवीस

✔ सुराज्य/मुंबई

**मुंबईत 'मराठा तितुका मेळवावा' या विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले, यावेळी फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीयमंत्री पियुष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर उपस्थित होते.**



फडणवीस म्हणाले, 'आम्ही आता इंजिनिअरिंग किंवा इतर शिक्षणदेखील मराठी भाषेतून करणार आहोत. मराठी भाषा ही ज्ञान भाषा करणार आहोत. मराठी नाट्य संस्कृतीची प्रगल्भता इतर कशात पाहता येत नाही. जगातील आयटीमध्ये मराठी माणसाला बोलबाला आहे. महाराष्ट्र उद्योग क्षेत्रात पुढे होता. आता त्याला आणखी पुढे आणण्याचा प्रयत्न येत्या काळात करणार आहे. जगातील प्रत्येक खंडातील लोक या संमेलनात उपस्थित आहेत. मराठी भाषेला समृद्ध करण्याचे काम स्वातंत्र्यवीर सावकरांनी केले. भारतीय भाषा जगवण्यासाठी ज्ञान भाषेत रुपांतर केले पाहिजे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'आपले सण-संस्कृती जोपासली पाहिजे. मराठी भाषिकांसाठी काय करावे लागेल ते करण्याची आमची तयारी आहे. आमचे सरकार आल्यानंतर सर्व सण सुरू करण्यात आले आहेत. मुंबईतील मराठी माणूस बाहेर जाता कामा नये यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. जे बाहेर गेले आहेत त्यांना मुंबईत आणण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. त्यासाठी पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावले जातील. मराठी भाषेचा आणि विज्ञानाचा जयघोष एकाचवेळी होत आहे. जी २० अध्यक्षपद मिळालं हे फार मोठे आहे. मराठी माणूस जगभरात आहे ही आनंदाची बाब आहे. मुंबईतला मराठी टक्का घसरू देणार नाही.'

यावेळी दीपक केसरकर म्हणाले, 'सरकारच्या विरोधात बोलणाऱ्याला तुरुंगात पाठवणारे सरकार होते. पण आता आम्ही सर्वांचे ऐकून घेतो आणि काम करतो. तुरुंगात पाठवणाऱ्या सरकारची मुदत संपली आहे.

## धनंजय मुंडेंचा अपघात, गाडीचे बोनेट पार चेपले

✔ सुराज्य/बीड


राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांच्या गाडीचा मंगळवारी रात्री अपघात झाला. आज सकाळपर्यंत अनेकांना या अपघाताबद्दल कोणतीही माहिती नव्हती. अखेर धनंजय मुंडे यांनी सोशल मीडियावर पोस्ट टाकत आपला अपघात झाल्याची माहिती दिली होती. परळीतील आझाद चौकात त्यांचा अपघात झाला होता. यामध्ये धनंजय मुंडे यांनी मला किरकोळ दुखापत झाल्याचे म्हटले होते. परंतु, बुधवारी सकाळी धनंजय मुंडे मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी निघाले तेव्हा त्यांची अवस्था पाहून या अपघातात त्यांचा चेहरा आणि डोक्यालाही दुखापत झाल्याचे दिसत आहे. धनंजय मुंडे हे घरातून निघत असताना त्यांचे जवळचे कार्यकर्ते त्यांच्या डोक्यावर चापूनचोपून पटका बांधताना दिसले. धनंजय मुंडे यांच्या कपाळाच्या वरचा भाग दिसणार नाही, याची विशेष खबरदारी घेतली जात होती. यावेळी प्रसारमाध्यमांच्या कॅमेऱ्याची झालेली गर्दी पाहून धनंजय मुंडे हे तात्काळ रुग्णवाहिकेत बसून मुंबईच्या दिशेने रवाना झाले. मुंबईत आल्यानंतर त्यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार केले जाणार आहेत.



## लाकडी निंबोडी निविदा प्रकरण

# जिल्ह्यात संतापाची लाट; मुख्यमंत्र्यांना भेटणार : आ.शहाजीबापू

✔ सुराज्य/अकलूज





लाकडी निंबोडी योजनेसाठी निधी मंजूर करून निविदा काढल्याने जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून महाविकास आघाडी सरकारने लाकडी निंबोडी योजनेसाठी ३४८ कोटीचा निधी मंजूर करून सोलापूर जिल्ह्याच्या डोक्यात झोपेत असताना दगड टाकला होता. आता हे शिंदे - फडणवीस सरकार त्याच दगडाने पुन्हा एकदा सोलापूर जिल्ह्यावर वार करू पाहत आहे का असाच सवाल यानिमित्ताने विचारला जात आहे.

सरकार कोणतेही आले तरी जिल्ह्यावर अन्याय करण्याची संधी मात्र कोणीही सोडताना दिसत नाही अशाच भावना यानिमित्ताने ऐकावयास मिळत आहेत. आता याप्रकरणी आ. शहाजीबापू पाटील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर माहिती देणार आहेत. सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी म्हणून उजनी धरणाचा उल्लेख केला जातो. पाणी वाटपाचा फॉर्मुला तयार करून नऊ सिंचनाच्या योजना तयारही करण्यात आल्या. सीना माढा, भीमा सीना जोड कालवा, दहिगाव उपसा सिंचन योजना, शिरापूर उपसा सिंचन योजना, आष्टी उपसा सिंचन योजना बार्शी उपसा सिंचन योजना, बार्शी उपसा सिंचन योजना, सांगोला उपसा सिंचन योजना, मंगळवेढा उपसा सिंचन योजना पण या नऊपैकी एकही अद्याप शंभर टक्के योजना पूर्ण झालेली नसताना असलेल्या योजना सोडून नसलेल्या योजनेसाठी निधी देऊन सरकार सोलापूर जिल्ह्याची सरळ सरळ फसवणूक करताना दिसत आहे. लाकडी निंबोडी योजनेमध्ये जी गावे समाविष्ट आहेत त्यात विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या काटेवाडी गावाचा समावेश आहे. काटेवाडी गाव हे बारामती तहसील यांनी दुष्काळी आहे म्हणून सर्टिफिकेट दिले आहे त्यानंतर ही योजना मंजूर केली गेली आहे अतिशय दिशाभूल करणारे हे सर्टिफिकेट आहे. आपले मतदारसंघ सुरक्षित ठेवण्यासाठी बारामतीकरांनी आजपर्यंत सोलापूर जिल्ह्याची दिशाभूल केली आणि आता त्याच कारणासाठी शिंदे-फडणवीस सरकार सोलापूर जिल्ह्याची दिशाभूल करू पाहत असेल तर जिल्हा शांत राहणार नाही हा संदेश सरकारला द्यावाच लागेल. २०२१ मध्ये उजनीतील पाच टीएमसी पाणी पळवण्याचा प्रकार झाला होता यावर सोलापूर जिल्ह्याने आक्रमक होत हा निर्णय रद्दबातल करायला लावला होता.आता दुसऱ्यांदा लाकडी निंबोणी प्रकरणावरून सोलापूर जिल्ह्याला डीवचले गेले आहे त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन बळ दाखवणे गरजेचे बनले आहे.

■ **भ्रमनिरास आणि अपेक्षाभंग :** महाविकास आघाडी सरकार कोसळल्यानंतर शिंदे फडणवीस सरकार आल्यानंतर त्यांनी महाविकास आघाडी सरकारच्या सर्वच योजना व विकास निधी स्थगित केला होता. यामध्ये लाकडी निंबोडी याचा देखील सहभाग होता मग निधी मंजूर करून कशा काय निविदा काढण्यात आल्या असा सवाल आता जिल्ह्यातील जनता शिंदे - फडणवीस यांना विचारताना दिसत आहेत. या सरकारकडूनही सोलापूर जिल्ह्याचा याविषयी भ्रमनिरास आणि अपेक्षाभंग होताना दिसत आहे.

■ **भाजपाचे वर्चस्व तरीही... :** सोलापूर जिल्ह्यामध्ये आठ आमदार दोन खासदार यामुळे संपूर्ण जिल्ह्यावर भाजपाचेच वर्चस्व असल्याचे चित्र आहे तरीही बारामती लोकसभा व इंदापूर विधानसभा जिंकण्याच्या लालसेपोटी भाजपाने ही खेळी केल्याचे लोकांतून बोलले जात आहे.त्यामुळे त्यांच्या सोयीस्कर राजकारणासाठी सोलापूर जिल्ह्याचा का बळी दिला जातोय असाही सवाल या निमित्ताने विचारला जात आहे.

■ **जिल्ह्यावर होणारा अन्याय सहन करणार नाही: आ. शहाजीबापू**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जवळचे आमदार म्हणून आमदार शहाजी बापू पाटील यांचा उल्लेख केला जातो याविषयी त्यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, सोलापूर जिल्ह्यावर होणारा अन्याय सहन केला जाणार नाही या संदर्भात लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असून याबाबतची सविस्तर माहिती त्यांना सांगणार आहे.



## गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. सावंत यांच्या हस्ते डॉ. अप्पासाहेब देशमुख यांना पुरस्कार प्रदान

✔ **सोलापूर** : माळशिरस नगरपंचायतीचे नगराध्यक्ष डॉ. अप्पासाहेब देशमुख यांना गोवा राज्याचा मानाचा प्रेरणा मूर्ती पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार देण्यात आला. आप्पासाहेब देशमुख यांचे सामाजिक क्षेत्रामध्ये असणारे कार्य व युवा वर्गामध्ये त्यांच्या कार्याबद्दल घेण्यासारखी असणारे प्रेरणा तसेच समाजाप्रती त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या कामांच्या गौरव या कामाची दखल घेत गोवा 'महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात मानाचा मानला जाणारा हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्यासोबत संस्कृती आणि पर्यटन मंत्री श्रीपाद नाईक, माजी मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे, माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत, ॲड. रमाकांत खलप, आ. डॉ.चंद्रकांत शेटे आदी उपस्थित होते. डॉ. देशमुख यांना या पूर्वी राज्यपाल भगतसिंह कोशारीच्या हस्ते देखील यांना पुरस्कार मिळालेला आहे. या पुरस्कारामुळे माळशिरसकरांच्या व नगराध्यक्ष या नात्याने नगरपंचायतीच्या शिरपेचामध्ये आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

## श्री सिद्धेश्वर तलावात बोटिंग व्यवस्था सुरू करा : कोठे

✔ **सोलापूर** : शहरातील श्री सिध्देश्वर तलावामध्ये बोटिंग व्यवस्था सुरु करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी महापालिका आयुक्त शीतल तेली- उगले यांच्याकडे केली आहे. सिद्धेश्वर मंदिर परिसरात यापूर्वी महापालिकेच्या वतीने लहान मुलांच्या खेळणी साठी टॉय ट्रेन सुरू करण्यात आली. तेव्हापासून सिद्धेश्वर तलावात बोटिंग व्यवस्था सुरू करण्यासंदर्भात प्रशासनाकडे अनेकांनी केली आहे. सिध्दरामेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा व इतर राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. शहरातील सर्व भक्तगणही नेहमी या परिसरात येत असतात. महापालिकेकडून सध्या या ठिकाणी लेझर शोच्या माध्यमातून येणाऱ्या भक्तांची चांगली सोय करण्यात आलेली आहे. महापालिकेकडून आता याठिकाणी बोटींगची सेवा सुरु झाली तर देवदर्शन तसेच सोलापुरात आलेल्या पर्यटकांना मध्यवर्ती भागात चांगल्या सोयीचे होणार आहे. प्रशासनाने तातडीने यावर निर्णय घेऊन बोटिंग सुरू करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे देवेंद्र कोठे यांनी केली आहे.

## निवडणुकीत जास्तीत जास्त युवकांना उमेदवारी देणार : नरोटे

✔ **सोलापूर** : युवकांनी आपल्याला भागात जनतेची कामे करा, अडचणी सोड़वाव्यात, आगामी महानगपालिका निवडणुकीत जास्तीत जास्त युवकांना उमेदवारी देण्याचा प्रयत्न राहिल म्हणून युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी कामाला लगावे, असे प्रतिपादन काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी केले. सोलापूर शहर युवक काँग्रेसची महत्वाची बैठक सोलापुर युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे यांनी शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस भवन सोलापुर येथे आयोजित केली होती. यावेळी वाहिद बिजापुरे, महेश लोंढे, महेश जोकारे, प्रवीण जाधव, श्रीकांत वाडेकर, अनंत म्हेत्रे, ओंकार गायकवाड, आदिंची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीस गणेश साळुंखे, दाऊद नदाफ, विवेक कन्ना, संजय गायकवाड, विवेक इंगळे, सुशीलकुमार म्हेत्रे, बाबूराव क्षीरसागर, ज़ीशान सय्यद, शरद गुमटे, प्रतीक शिंगे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक अध्यक्ष गणेश डोंगरे यांनी तर सूत्रसंचालन तिरुपती परकीपंडला यांनी केले.

## साडेचार हजारांचा गुटखा जप्त

✔ **सोलापूर** : रजनीगंधा पान मसालाच्या ६३ पुड्या व बाबा नौरतन पानमसाला गुटखाचे १५ पुड्या असा एकूण चार हजार पाचशे रुपये किमतीचा गुटका जप्त करून एकाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.३ जानेवारी रोजी दुपारी साडेतीन वाजता लियाकत पान शॉप सिद्धेश्वर पेठ येथे घडली.याप्रकरणी रेणुका रमेश पाटील (वय-३५,नेमणूक अन्नसुरक्षा अधिकारी अन्न व औषध प्रशासन) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून जाहीद अशपाक पटेल (वय-३८,रा.सिद्धेश्वर नगर भाग-१ मजरेवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोसई.लोंढे हे करीत आहेत.

## विविध दोन ठिकाणी दुचाकी लंपास

✔ **सोलापूर** : सिद्धेश्वर कृषी प्रदर्शन येथे सैफअली म.रफिक पठाण (वय-२७, रा.थोरली ईरण्णा वस्ती, वांगी रोड) यांनी पार्क करून ठेवलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली आहे.त्यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. दुसऱ्या घटनेत नरेश श्रीनिवास सोमा (वय-२७, रा.विडी घरकुल) यांनी व्यंकटेश मंदिरासमोर पार्क करून ठेवलेली मोटार सायकल चोरट्याने चोरून नेली आहे. याप्रकरणी जेलरोड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठकीत ७४ अर्जांचा निपटारा

▶ **२४ अर्जदारांना परवानगी नाकारली**

✔ सुराज्य/सोलापूर



**परवानगी न घेतल्यास कारवाई**

विनापरवाना वृक्ष, फांदीतोड करणे हे बेकायदेशीर आहे. केवळ वृक्षच नव्हे तर फांदी तोडण्यासाठीदेखील परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नियमाबाबत जनजागृती होत असल्याने नागरिक समितीकडे मोठ्या प्रमाणात अर्ज करीत आहेत. विनापरवाना तोड केल्यास फौजदारी कारवाई करण्याची तरतूद आहे.

महापालिकेतील वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीत वृक्ष-फांदी तोड करण्यास परवानगी देणे वा नाकारणे यासंदर्भातील ७४ अर्जांवर निर्णय घेण्यात आले. यामध्ये २४ अर्जदारांना वृक्ष-फांदी तोड करण्यास परवानगी नाकारण्यात आली.

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक झाली. त्यामध्ये समितीकडे वृक्षतोड, फांदीतोड यासंदर्भात आलेल्या अर्जांचा निपटारा करण्यात आला. बांधकामास अडसर व धोकादायक असलेले वृक्ष तसेच फांद्या तोडणे, झाडे-झुडपी तोडणे आदींबाबत समितीकडे ७४ अर्ज आले होते.यामध्ये वठलेले तसेच धोकादायक वृक्ष तोडणे, इलेक्ट्रीक तारांना स्पर्श करणाऱ्या फांद्या तोडणे, वृक्ष सुस्थितीत आहे की नाही याविषयक अर्जांचाही समावेश होता.

या प्रक्रियेमध्ये सुरूवातीला समितीकडे आलेल्या अर्जांची दखल घेण्यात येते. समितीचे सदस्य प्रत्यक्ष स्थळावर जाऊन वृक्ष, फांद्यांची पाहणी करतात. वृक्ष धोकादायक असेल तरच ते तोडण्यास परवानगी दिली जाते. बांधकामास अडसर ठरणारे वृक्ष, वीजेच्या तारांना स्पर्श करणाऱ्या फांद्या याबाबत पाहणीनंतर समितीमध्ये निर्णय घेण्यात येतात.

## चोरट्याने सामानाची पिशवी पळवली

✔ **सोलापूर** : कपड्याच्या दुकानात खरेदी करत असताना पतीने पत्नीच्या हातात दिलेली सामानाची पिशवी चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.३ जानेवारी रोजी नवी पेठ येथे घडली. याप्रकरणी आप्पाशा काळे (वय-४३,रा.शंकर नगर, शिवशाही समोर होटगी रोड) यांनी फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पिशवीत मोबाईल, घरगुती वस्तू रोख १७ हजार मिळून वीस हजार रुपयांचा ऐवज होता. तपास पो.ना. नाईक बाबर हे करीत आहेत.

## पंढरपूर श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सूरज सरवदे



✔ **पंढरपूर** : पंढरपूर श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी दै.सुराज्यचे सुरज सरवदे तर कार्याध्यक्षपदी दै.तरुण भारत संवादचे संतोष रणदिवे यांची निवड एकमताने करण्यात आली. पत्रकार भवन येथे मावळते अध्यक्ष संकेत कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी उपाध्यक्षपदी संतोष कुलकर्णी, सचिवपदी नागनाथ सुतार, सहसचिवपदी दत्तात्रय देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. कार्यकारणी सदस्यपदी नितीन शिंदे, दत्ता खटवटे तर सल्लागारपदी विनायक हरिदास, संकेत कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी सत्यविजय मोहोळकर, अभय जोशी, सुनील दिवाण प्रशांत आराध्ये, महेश खिस्ते, अनिरुद्ध बडवे, अतुल बडवे, मंदार लोहोकरे, अभिराज उबाळे, सचिन कसबे, भारत नागणे, महेश भंडारकवठेकर, शाम दिवेकर, सचिन झाडे, दादासाहेब कदम उपस्थित होते

## विजापूर रोड मध्यवर्ती मंडळातर्फे ७५ आदर्श व्यक्तींचा सत्कार

✔ **सोलापूर** : विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने नव्या वर्षाचे स्वागत अनोखा कार्यक्रम राबवून करण्यात आले. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त वेगवेगळ्या क्षेत्रातील ७५ आदर्श व्यक्तींचा करण्यात आला होता.



या सत्कार मूर्ती मध्ये स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, सैनिक शाळेतील विध्यार्थी, राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर पदक प्राप्त खेळाडू, वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेले ज्येष्ठ नागरीक आदींचा समावेश होता. या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे नियोजन ट्रस्ट चे विश्वस्त विजय शाबादी यांनी केले होते. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास प्रा. भिमाशंकर बिराजदार, प्रा. श्रुती वडगबाळकर, जैन पाईप चे राजेश दीक्षित, यंकटेश दोंता, सुवर्णा काळे, माजी आमदार व मध्यवर्ती गणेशोत्सव ट्रस्ट चे विश्वस्त शिवशरण पाटील, ट्रस्ट अध्यक्ष सुभाष चव्हाण आदी प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी जयजवान जय किसान सैनिक स्कुल चे विध्यार्थ्यानी संचलन करून प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. याप्रसंगी

यावेळी प्रा. बिराजदार, दीक्षित यांनी या उपक्रमाचे कौतूक केले.कार्यक्रमास उत्सव अध्यक्ष महेश घाडगे, कार्याध्यक्ष महेश देवकर, सचिव मदन पोलके, शिवराज कांबळे, बिळेनी बिराजदारसर, चंद्रकांत चोळके, सुजाता गायकवाड, सौ. आनवरे, नागणसुरे, सुजाता आमणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी महिला आघाडी प्रमुख सुरेखा गोब्बुर, मीना गायकवाड, उमेश यळसंगी, मल्लिनाथ भुशेट्टी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मध्यवर्ती गणेसोत्सव ट्रस्टसचिव विश्वनाथ आमणे यांनी केले.

## भाडेकरू ठेवल्याच्या कारणावरून पतीस मारहाण

✔ **सोलापूर** : भाडेकरू ठेवल्याच्या कारणावरून पहिल्या पत्नीकडून पतीस शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली. पत्नी विरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२९ डिसेंबर रोजी भाग्यलक्ष्मी नगर नई जिंदगी येथे घडली.

या प्रकरणी नजीर मकबुल नदाफ (वय-५४,रा. जुना विडी घरकुल) यांनी फिर्याद दाखल केली आहे. हसीना नदाफ (रा.भाग्यलक्ष्मी नगर,नई जिंदगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. २९ डिसेंबर रोजी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास नजीर हे नेहमीप्रमाणे त्यांची पहिली पत्नी हसीना यांच्या घरी गेले होते. हसीना यांनी हॉलमध्ये भाडेकरू ठेवल्याने नजीर यांनी त्यांना विचारणा केली. त्यावेळी हसीना हिने तुला विचारायला तू कोण लागून गेला असे म्हणत शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तपास पो.ह.साळुंखे हे करीत आहेत.

## सहकार महर्षी गणपतराव साठे जयंतीनिमित्त माढा महोत्सव

### —— १६ ते १७ जानेवारी दरम्यान राज्यस्तरीय खुल्या मॅरेथॉन स्पर्धेसह विविध कार्यक्रम ——

✔ सुराज्य/माढा



सोलापूर जिल्ह्याचे पहिले सहकार महर्षी गणपतराव साठे यांच्या १३५ जयंतीनिमित्त माढ्यात दिनांक १६ जानेवारी ते १७ जानेवारी दरम्यान माढा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत राज्यस्तरीय खुल्या मॅरेथॉन स्पर्धेसह विविध स्पर्धा व कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती संत कुर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे यांनी पत्रकार परिषदेत दिली. माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेत प्रतिमापूजन केले जाणार आहे.

येथून शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून शहरातील सर्व शाळा सहभागी होणार आहेत. दुसऱ्या दिवशी १७ तारखेला सकाळी ७ वाजता पहील्यांदाच राज्यस्तरीय खुल्या मॅरेथॉन स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धा माढा- शेटफळ रोडवर होणार असून स्पर्धेतील पुरूषांसाठी दहा व स्त्रियांसाठी सहा किलोमीटर अंतर असणार आहे.

मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्यांमधील पहिल्या सहा क्रमांकांना अनुक्रमे ११हजार, ७ हजार, ५ हजार, ४ हजार, ३ हजार, २ हजार रूपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तर सहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना १००० रूपयांची सहा पारितोषिके देण्यात येणार आहेत. सायंकाळी प्रशालेच्या मैदानावर विविध गूणदर्शनाचा कार्यक्रम होणार असून यामध्ये शहरातील सर्व शाळेतील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. दि.१० ते १२ जानेवारी दरम्यान शहरातील सर्व शाळांमध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा होणार असून या स्पर्धा शाळा स्तरावर घेऊन यामधील स्पर्धकांना शाळास्तरावरच पहिल्या तीन गुणवंतांना प्रमाणपत्र, व स्मृतीचिन्ह दिले जाणार आहे. मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणीची व्यवस्था करण्यात आली आहे.

यासाठी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक किरण जाधव, क्रिडाशिक्षक प्रवीण घाडगे, कृष्णा राऊत, नवनाथ लवटे यांच्याकडे नावनोंदणी सुरू आहे. या पत्रकार परिषदेस नगराध्यक्षा मिनलताई साठे सभापती नितीन नाना साठे लक्ष्मण राऊत किरण जाधव, प्रवीण घाडगे, सुनिल काळे, उपस्थित होते.

# महावितरणच्या आंदोलनात साडेसात हजार कर्मचारी सहभागी

## जुनी मील कंपाऊंड येथे कर्मचाऱ्यांची निदर्शने, घोषणांनी परिसर दणाणला

✔ **सोलापूर** : महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी अधिकारी अभियंते संघर्ष कृती समितीच्या वतीने ७२ तासांचा संपात सोलापूर जिल्हातील बारामती परिमंडल विभागातील साडेसात हजार कर्मचारी सहभागी झाले होते. १३ मुख्यविभाग आणि ७ उपविभागामध्ये अशा एकूण २१ ठिकाणी निदर्शने करत जोरदार घोषणा बाजी केली.

सोलापूर शहरात जुनी मिल कंपाऊंड येथे कर्मचाऱ्यांनी निदर्शने करत खासगी करणाऱ्या धोरणाला विरोध करत घोषणा बाजी केली.

महावितरण महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील खाजगीकरण धोरण बंद करा, महावितरण मध्ये अदानी कंपनीला समांतर वीज वितरणाचा परवाना देऊ नये,कंत्राटी आऊटसोर्सिंग व सुरक्षा रक्षक कामगारांना कायम करा, तिन्ही कंपन्यातील रिक्त जागा भरा, इम्प्लामेंट पद्धतीने कंत्राटीकरण बंद करा, महावितरण मधील २०१९ नंतरचे उपकेंद्रे कंपनी मार्फत चालवा, कायम कर्मचाऱ्यांची पदस्थापना करा या मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी अधिकारी अभियंते संघर्ष कृती समितीने ७२ तासाची संपाची हाक दिली होती.

मंगळवार मध्यरात्री १२ वाजाता संपास सुरूवात झाली. सोलापूर जिल्हात २६१ उपकेंद्रे आहेत. या विभागातील आडीचहजार कर्मचारी आंदोलनात सहभागी होते.सोलापूर बारामती परिमंडल विभागात येते या



परिमंडलातील १३ मुख्यविभाग आणि ७ उपविभागातील कर्मचारी, अधिकारी, हंगामी कर्मचारी, सहभागी झाले होते. सोलापूर, पंढरपुर, अकलूजसह सह एकूण २१ ठिकाणी महावितरणच्या कार्यालया जवळ निदर्शन करत घोषणा बाजी केली. अदानी अंबानी गो बॅक, ऊर्जामंत्री होष में आवो, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. वीज क्षेत्रातील विविध ३२ कर्मचारी संघटना या संपात सहभागी झालेल्या होत्या. राज्यातील सुमारे ८६ हजार वीज कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी शासनाच्या विरोधात उत्स्फूर्तपणे या संपात सहभाग नोंदवत आपल्या तीव्र भावना दाखवून दिल्या.

सोलापुरात जुनी मील कंपाऊंड येथे महावितरणच्या कार्यालया समोर महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अधिकारी, अभियंते संघर्ष कृती समितीच्या वतीनं जोरदार निदर्शनं करण्यात आली. यावेळी विविध घोषणा देऊन परिसर दणाणून सोडण्यात आला. राज्य सरकार अदानी सारख्या बड्या उद्योजकांना अनुकूल आणि जनतेला प्रतिकूल असा निर्णय घेत खाजगीकरणाचा घाट घालत आहे. यामुळे खूप मोठ नुकसान सर्वांचचं होणार आहे. भविष्यात जनतेला वाढीव दरानं वीज मिळणार आहे. त्यामुळं खाजगीकरणा विरोधातील या लढाईत जनतेने वीज कर्मचारी आणि अधिकारी यांना साथ द्यावी असे आवाहन नितीन चव्हाण (राज्य अध्यक्ष तांत्रिक कामगार युनियन), विलास कोल्हे (झोनल सचिव वर्कर्स फेडरेशन) ,ओंकारनाथ गाये (झोन उपाध्यक्ष तांत्रिक कर्मचारी युनियन) यांनी केले या आंदोलनात वीज कर्मचारी, अधिकारी सहभागी झाले होते.